संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, गुरुवार दि. १२.१२.२०२४ | अंक नं.२३८ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020



उपवासाच्या सर्व प्रकारच्या पदार्थांसाठी ग्राहकांची प्रथम पसंती... सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट
राजमोती साबुदाना
सर्वत्र उपलब्ध
1 Kg | 500 gm | 250 gm • इन्स्टंट साबुदाना सुद्धा उपलब्ध !

आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range..!
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090


# शहरातील एका धार्मिक स्थळामध्ये बांगलादेशी इसम घुसल्याचा संशय

## पोलिस चौकशीत ते भोपाळ येथून धार्मिक कार्यक्रमासाठी आल्याचे स्पष्ट

नगर – नगर शहरातील भोसले आखाडा परिसरातील एका धार्मिक स्थळात गुरुवारी (दि.१२) सकाळी संशयीत बांगलादेशी इसम घुसल्याची अफवा पसरली. याबाबत माहिती मिळताच कोतवाली पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी सर्व ७ ते ८ संशयितांना ताब्यात घेत पोलिस ठाण्यात आणले. तेथे त्यांची कसून चौकशी केल्यावर ते सर्व भारतीयच असून, इज्तेमासाठी मध्यप्रदेशातील भोपाळ येथून नगरला आले असल्याचे स्पष्ट झाले आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, भोसले आखाडा परिसरात असलेल्या एका धार्मिक स्थळात ७ ते ८ अनोळखी इसम जाताना परिसरातील नागरिकांनी पाहिले. ते नगर शहरातील नसल्याने आणि यापूर्वी त्यांना या ठिकाणी पाहिलेले नसल्याने नागरिकांना ते बांगलादेशी घुसखोर असावेत, असा संशय आला. त्यामुळे परिसरातील नागरिक त्या धार्मिक स्थळाजवळ गोळा झाले. काही नागरिकांनी त्यांना तुम्ही कोठून आलात? अशी विचारणा केल्यावर आम्ही भोपाळ येथून आल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे नागरिकांचा संशय आणखीच बळावला.

अनेकांनी शहरात इकडे, तिकडे फोनाफोनी सुरु केली. काही नागरिकांनी कोतवाली पोलिसांना फोन करून माहिती दिली. ही माहिती मिळताच पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी गेले. त्यांनी त्या इसमांना ताब्यात घेत चौकशीसाठी पोलिस ठाण्यात आणले. त्यांच्याकडे बराच वेळ चौकशी करण्यात आली त्यांच्याकडील आधार कार्डची तपासणी करून भोपाळ येथे संपर्क साधून माहिती घेण्यात आली. चौकशीअंती ते सर्वजण भारतीयच असल्याचे समोर आल्यावर त्यांच्याकडून त्यांची सर्व माहिती तसेच ते नगरला कशासाठी आले, किती दिवस राहणार, पुन्हा कधी परत जाणार? ही माहिती लिहून घेतल्यावर त्यांना सोडून देण्यात आले असल्याचे कोतवालीचे पोलिस निरीक्षक प्रताप दराडे यांनी सांगितले.


आता आयुर्वेदिक उपचार घ्या
कॅशलेस
फक्त आपल्या "विश्वमंगल" मध्येच
• अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वप्रथम NABH मानांकित कॅशलेस आयुर्वेद हॉस्पिटल
• सर्व जुनाट विकारांकरिता आयुर्वेद व पंचकर्म उपचार
• विविध शस्त्रक्रिया टाळण्यासाठी विशेष उपचार
• सर्व आरोग्य विमा/हेल्थ इन्शुरन्स व्दारे कॅशलेस उपचार घेण्याची सुविधा
VISHWAMANGAL
पहिला मजला, आदर्श समृध्दी अपार्टमेंट, चौपाटी कारंजा, अहिल्यानगर -414001
हेल्पलाईन- 92 90 900 900

VAISHNAVI TILES & TRADING CO.
• सर्व प्रकारच्या टाइल्स • ग्रॅनाइट • सॅनिटरी वेअर
• पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग • C.P. फिटिंग्ज
9590151515 | 9262515151
VARMORA Innovating happiness TILES • BATHWARE
KERAKOLL The GreenBuilding Company
CARYSIL German Engineered
colortile
RAK CERAMICS
NIRALI
TIMEX
ICON
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर

Glamour Rush
RADHYA
RADHYA MAKE-UPS
BOOK BEST BRIDAL MAKE-UP ARTIST
STARTING PRICE - 6999/- ONWARDS
BOOK FAST CALL
- FOR BOOKING -
8830037212

Admissions Open
St. Michael's School
NARAYANDOHO
For STD : 1,2,3,5,6,8
Forms available on 16th 17th 18th Dec 24
(Timing : 10 am To 1 pm.)
School Office On Sholapur Road,Ahmednagar
Ph : 0241-2321529

आज भव्य शुभारंभ !
R S Bafna Jewellers
५० वर्षांची गौरवशाली परंपरा जपणारे जळगावचे
आर. एस. बाफना ज्वेलर्स
म्हणजे पारदर्शकता, शुद्धता आणि विश्वासाने बहरलेली सुवर्णपिढी...
नव्या शुभारंभाचा हा मंगल क्षण आणखी भव्य करण्यासाठी आम्ही आपल्याला आमंत्रित करत आहोत आमच्या
अहिल्यानगर येथील नव्या भव्य शोरूमच्या शुभारंभ सोहळ्यासाठी !
• भव्य शुभारंभ : गुरुवार, १२ डिसेंबर २०२४ • वेळ : दुपारी १२:३० पासून
• अहिल्यानगर : १३, सावेडी नाका, सावेडी, इंपल्स हॉस्पिटल जवळ
सादर आहे.. खास शुभारंभानिमित्त ऑफर !
18K व 22K सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर — FLAT 25% OFF — ऑफर दिनांक 12 ते 31 डिसेंबर 2024 पर्यंत
R S Bafna Jewellers
जळगांव | नाशिक | अहिल्यानगर
दैनंदिन सोने व चांदीच्या किमतीतील अपडेट्स, नवीन कलेक्शन्स, एक्सक्लुसिव ऑफर्स आणि सवलतीच्या सूचनांसाठी आमच्या व्हॉट्सअ‍ॅप चॅनेलला जॉइन करा.
• Customer Care Number : +91 9175915644 • Customer Care E-mail : rsbjcare@gmail.com
Shop online at : www.jewelroof.com | • All Days Open • Follow us at | # BE VEGETARIAN · BE HAPPY
www.malhar.org_12/24

Gehena A Premium Jewellery Exhibition
अहिल्यानगरमध्ये प्रथमच
MOHINI Pune, Pimpri-chinchwad
डायमंड व गोल्ड ज्वेलरींचे भव्य एक्झिबिशन
13 | 14 | 15 डिसेंबर 2024
वेळ : सकाळी 10.30 ते सायं. 8 पर्यंत
स्थळ - आयरिस हॉटेल
स्टेशन रोड, अहिल्यानगर
For More Information Contact 9892398360
Event organised by drishti Events And Promotions Pvt. Ltd.

An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
MAHA DiSCOUNT offer
Just in 1800 Any Course
JOIN TODAY
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY PRIME, PHOTOSHOP, CORELDRAW, IILUSTRATOR, INDESIGN, C, C++, HTML, 2D CAD, 3D CAD
Delhi Gate Branch
1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001
9371051769
Old ST stand Branch
Office No.140, 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road, Ahmednagar-414001
9371151769
Pipeline Branch
Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003
7447761769

यु फोम, बॉंडेड फोम, हिटलॉन फोम, फोम मॅट्रेसेस्, बेड बॅक, सोफा क्लॉथ, वेलवेट क्लॉथ, सोफा कव्हर्स, सोफा रनर पट्टी, नविन सोफा फ्रेमसह तयार करुन मिळेल, धुळी पासुन संरक्षणासाठी प्लास्टीक तयार पडदे

गुलाबचंद कारपेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com


## जगाला आदर्श ठरलेले - 'प्रगती' डिजीटल प्लॅटफॉर्म

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

आपल्याच देशातील ज्ञात-अज्ञात कार्यकर्तृत्वाचे महत्त्व आपण तेव्हाच ध्यानात घेतो जेव्हा त्याला मोठ्या विदेशींनी मान्यता दिली. कौतुक व प्रशंसा केली तर... प्रसिद्ध विद्यापीठ ऑक्सफर्डच्या सेड बिझनेस स्कूलने गेटस् फाऊंडेशनच्या साहाय्याने एक संशोधन केले.

ऑक्सफर्डच्या संशोधनानुसार पंतप्रधान मोदींच्या मार्गदर्शनाखाली सुरू केलेल्या 'प्रगती' या प्रशासनासाठीच्या डिजीटल प्लॅटफॉर्ममुळे देशातील रखडलेल्या पायाभूत सुविधांसाठीच्या प्रकल्पांना मोठ्या प्रमाणात गती मिळाली असून हे सर्व प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यास मदत होत आहे.

पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते २०१५ मध्ये 'प्रगती' या डिजीटल प्लॅटफॉर्मचे लोकार्पण झाले होते. यामुळे सुमारे २०५ अब्ज डॉलर किंमतीच्या साधारणतः ३४० प्रकल्पांना गती मिळाली.



२०१३ मध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारताच्या ३ मोठ्या विकासाला अडथळा आणलेल्या समस्यांचा उहापोह केला होता. पण या 'प्रगती'मुळे इन्फ्रास्टॅक्चरटी प्रोजेक्टस् अत्यंत वेगाने कार्यान्वित झालेत. रेल्वेची ४५० प्रोजेक्टस्, रस्त्यांचे जाळे, जलमार्ग, विमानतळांच्या निर्मितीची घोडदौड चालू आहे

पायाभूत सुविधांबरोबरच सामाजिक विकास कार्यक्रमांना गती देण्याबाबत 'प्रगती' व्यासपीठाचा प्रभाव वाढलाय. नळजोजडणी ग्रामीण भागात ५०% नी वाढली तर नागरिकांच्या तक्रारींना केवळ १५ दिवसांतच प्रतिसाद मिळतोय.

# जमीन खरेदी-विक्री व्यवहारातील फसवणूक आता टाळता येणे शक्य

### अधिकार अभिलेखाला आधार अन् मोबाईल क्रमांकाची जोडणीची मोहीम

नगर - शेतजमीन, मालमत्ता खरेदी-विक्रीच्या वाढत्या गैरप्रकाराला आळा घालण्यासाठी मूळ मालकाचा आधार क्रमांक आणि मोबाईल नंबरची जोडणी अधिकार अभिलेखाला करण्याचा महत्वाकांक्षी 'ऑग्रिस्टॅक' प्रकल्प भूमिअभिलेख आणि महसूल विभागाच्या संयुक्त विद्यमाने राबविला जाणार आहे. शेतकऱ्यांचे ओळखपत्र तयार केले जाणार आहे. त्यात शेतकऱ्याचे नाव, त्याच्या जमिनीची माहिती व आधार आणि मोबाईल क्रमांक जोडला जाणार आहे. तहसीलदार, मंडलाधिकारी, तलाठी यांना येत्या काही दिवसांमध्ये 'अॅदग्रिस्टॅक' या मोहिमेचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यानंतर प्रत्यक्षात ग्रामपातळीवर तलाठी या कामाला सुरूवात करणार आहेत. या मोहिमेला शेतकऱ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी अतुल चोरमारे यांनी केले आहे.

शेतजमीन, मालमत्ता यांचे मालक असण्याची सरकार रेकॉर्डनुसार कागदोपत्री असलेली नोंद ही ओळख आहे. बहुतांश वेळेस जमिनीचा मालक बाहेरगावी असल्यास काही लोकांकडून या जमिनीची परस्पर विक्री केली जाते. त्यासाठी तोतया व्यक्तीचे बनावट कागदपत्रे तयार केले जाते. त्यावरून विक्री केली जाते. मालकाच्या संमतीशिवाय शेत जमीन, मालमत्ता परस्पर विक्री होण्याचे गैरप्रकार अलिकडच्या काळात वाढत चालले आहे. यामध्ये मालमत्ता घेणाऱ्याचीही मोठी आर्थिक फसवणूक होत आहे. या गैरप्रकारांना लगाम लावण्यासाठी भूमी अभिलेखांना आधार जोडणी करण्याची परवानगी द्यावी. असा प्रस्ताव भूमिअभिलेख विभागाने केंद्र सरकारकडे दिला होता. त्याला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे.

एखादा शेतकरी जमिनीचा मालक असल्याची ओळख या प्रकल्पाच्या माध्यमातून राज्य सरकारला पटवून दिली जाणार आहे. त्यासाठी तलाठ्याकडे समक्ष जाऊन जमिनीची नोंद केली जाईल. जमिनीचा मालक हा तोच शेतकरी असल्याची खात्री तलाठी कोतवालाकडून करतील. शेतकऱ्याची ओळख निर्माण करण्यासाठी त्याचा आधार व मोबाईल क्रमांक जोडला जाईल. जमिनीचे मालक असण्यासाठी अधिकार अभिलेखाला आधार आणि मोबाइल क्रमांक जोडला जाणार आहे. त्यातून जमिनीचे मालक असल्याचे सिध्द होऊन व्यवहारांबाबत होणारी फसवणूक टळणार आहे.

### ओटीपी दिल्यानंतरच व्यवहार पूर्ण होणार

जमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहारांमध्ये अनेकांची फसवणूक होत आहे. याला आळा घालण्यासाठी सरकारने ही योजना आणली आहे. आता अभिलेखाला आधार क्रमांक आणि मोबाईल क्रमांक जोडल्याने अशा व्यवहाराची माहिती संबंधित शेतकऱ्याला असावी, यासाठी भूमिअभिलेख विभागाकडून एसएमएसव्दारे ओटीपी दिला जाईल. हा ओटीपी दिल्यानंतरच व्यवहार पूर्ण होणार आहे. यामुळे फसवणुकीला आळा बसण्यास मदत होणार आहे.

# डॉ.सागर वाघ ठरले जिल्ह्यातील पहिले 'पीडियाट्रिक ॲलर्जिस्ट'



नगर - येथील बालरोग तज्ज्ञ डॉ. सागर वाघ यांनी दिल्ली येथील गंगाराम इन्स्टिट्यूट फॉर पोस्ट ग्रॅज्युएट मेडिकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च सेंटरमधून डिप्लोमा इन अस्थमा व ॲलर्जी या विषयाच्या कोर्समध्ये उत्तीर्ण झाले आहेत. त्यामुळे हा कोर्स उत्तीर्ण होऊन अहिल्यानगर जिल्ह्यातील पहिले पीडियाट्रिक ॲलर्जिस्ट व लहान मुलांचे ॲलर्जी स्पेशालिस्ट होण्याचा मान डॉ. वाघ यांना मिळाला आहे.

ॲलर्जी हा बालवयातील कॉमन आजार असून, बाल व प्रौढांमध्ये विविध प्रकारे हा आजार असू शकतो. बालदमा, खाद्यपदार्थांची ॲलर्जी, सारख्या शिंका येणे, त्वचेवर चट्टे येणे किंवा औषधांची, किटकांची ॲलर्जी असू शकते. याशिवाय खाद्यपदार्थांद्वारे दूध, डाळी, अंडी, शेंगदाणे, भात अशी वेगवेगळ्या प्रकारची असू शकते. रेस्पिरेटरी ॲलर्जीमध्ये बालदमा, धुळ, थंड पाणी, थंड हवा याची, तसेच परम्युम, पावडर याची देखील ॲलर्जी असू शकते. ॲलर्जीची लक्षणे जीवाला धोका देणारी आढळून येतात. वाघ नर्सिंग होमच्या माध्यमातून मागील २० वर्षांपासून रुग्ण सेवेत कार्यरत असणारे डॉ. सागर वाघ आता रुग्णांना कोणत्याही प्रकारच्या ॲलर्जीवरील उपचाराची सेवा देणार आहेत.

लहान मुलांमधील बालदमा, ॲलर्जीचे आजार व त्यांचे निदान, उपचार, तसेच यासाठीच्या स्किन प्रिक टेस्ट, स्पायरोमेट्री, इम्पल्स, ऑक्सिमेट्री आदी तपासण्यांसाठी इतरत्र जाण्याची गरज नसून नगरमध्येच वाघ नर्सिंग होममध्ये या सर्व सुविधा मिळणार आहेत. डॉ. सागर वाघ अ.जि.म.वि.प्र. संस्थेचे उपाध्यक्ष स्व. रामनाथ वाघ यांचे चिरंजीव, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ व 'चिकित्सा'चे संचालक डॉ. धनंजय वाघ यांचे बंधू आहेत. स्व. रामनाथ वाघ यांच्या सामाजिक कार्याचा वारसा असाच पुढे घेऊन जाण्याचा मानस डॉ. वाघ यांनी व्यक्त केला.

## २३ डिसेंबर रोजी विभागीय पोस्टल पेन्शन अदालत

नगर - पोस्टाच्या पेन्शनविषयक तक्रारीच्या निवारणासाठी २३ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता वरिष्ठ अधीक्षक डाकघर, प्रधान डाकघर, अहिल्यानगर येथे विभागीय पोस्टल पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. संबंधितांनी मूळ लेखी अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे दोन प्रतीमध्ये १८ नोव्हेंबर पर्यंत वरिष्ठ अधीक्षक डाकघर, प्रधान डाकघर इमारत, दुसरा मजला, अहिल्यानगर येथे पाठवावीत. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा पेन्शन अदालतीमध्ये विचार केला जाणार नसल्याचे वरिष्ठ अधीक्षक डाकघर, अहिल्यानगर यांनी कळविले आहे.

# सर्जेपुरा येथे नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यास पकडले

### १३ हजार रुपयांचा नायलॉन मांजा जप्त, एकावर गुन्हा दाखल

नगर - मानवी जीवितास व प्राण्यांच्या जीवास घातक असलेला नायलॉन मांजा विक्री करण्यास व बाळगण्यास मनाई असताना, नायलॉन मांजा बाळगून बेकायदा विक्री करणाऱ्या एकास तोफखाना पोलिसांनी १३ हजार रुपये किमतीच्या मांजासह पकडले. ही कारवाई सर्जेपुरा परिसरातील हनुमान मंदिरासमोर बुधवारी (दि.११) सायंकाळी केली.

याबाबतची माहिती अशी की तोफखाना पोलीस ठाण्यात डायल ११२ या प्रणालीची माहिती मिळाली की सर्जेपुरा परिसरातील हनुमान मंदिरासमोर प्रशांत उर्फ प्रसाद योगेश भागवत याने त्याच्या राहत्या घरात नायलॉन मांजा, विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगला असून तो त्याची विक्री करीत आहे. अशी माहिती मिळाल्याने तोफखाना पोलिसांनी त्या ठिकाणी जाऊन अचानक छापा टाकला. घरातील प्रशांत उर्फ प्रसाद भागवत यास ताब्यात घेऊन त्याच्या घराची झडती घेतली असता त्याच्याकडे २६ रिळ मध्ये गुंडाळलेला तेरा हजार रुपये किमतीचा नायलॉन मांजा मिळून आला. पोलिसांनी प्रसाद भागवत यास नायलॉन मांजा सह ताब्यात घेतले.


नायलॉन मांजा बाळगण्यास व विक्री करण्यास महाराष्ट्र शासनाने १८ जून २०१६ च्या निर्णयाद्वारे बंदी घातलेली आहे. या आदेशाचा भंग करून नायलॉन मांजा बाळगून त्याची विक्री केल्यास व ग्राहकांनी मांजाचा वापर केल्यास मांजामुळे प्राण्यांना व मानवी जीवास हानी होण्याची दाट शक्यता आहे. अशा प्रकारे गंभीर स्वरूपाचा अपघात घडवून मानवी जीवितास हानी पोहोचू शकते याची जाणीव असताना मांजाची विक्री करताना आढळून आल्याने तोफखाना पोलीस ठाण्यात पो. कॉ. रंगनाथ ताके यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन प्रसाद भागवत यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२५, २२३ सह पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ३ सह महाराष्ट्र पोलीस कायदा १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गोपाल मंगलारम यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - सातभाई मळा, दिल्लीगेट येथील रहिवाशी गोपाल विठ्ठल मंगलारम (वय ५०) यांचे १२ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे आई, पत्नी, २ मुली, २ भाऊ, भावजया असा परिवार आहे.

## सुभाष गांधी यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - विनायक रेसिडेन्सी, चिपाडे, मळा, सारसनगर येथील रहिवासी सुभाष कनकमल गांधी उर्फ एस.के. गांधी (वय ७१) यांचे १२ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, ३ पुतणे, २ पुतण्या, १ बहिण असा परिवार आहे. प्रशांत, प्रमोद, विनय गांधी यांचे ते चुलते होत.

## गिरधरलाल झंवर यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - ब्राम्हणगल्ली, भिंगार येथील रहिवासी व आर. आर. भिंगारवाला फर्मचे संचालक गिरधरलाल रामनारायण झंवर (भिंगारवाला, वय ७९) यांचे १२ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. भिंगार येथील अम रधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ भाऊ, २ मुले, सुना, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते चुनीलाल झंवर यांचे ज्येष्ठ बंधू होत.


## सुलोचनाबाई बेल्हेकर यांचे निधन



सोनई - नेवासा तालुक्यातील सोनई येथील सुलोचनाताई (बाई) बेल्हेकर (वय ७६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले व एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

भानसहिवरे येथील सुलोचना बेल्हेकर सामाजिक व बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेशराव तसेच अशोकराव व रमेशराव बेल्हेकर, सौ. संजीवनी नानासाहेब खर्डे यांच्या त्या मातोश्री होत.

## रंगनाथ चव्हाण यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवाशी रंगनाथ बाबुराव चव्हाण (मिस्तरी) (वय ६३) यांचे १२ डिसेंबरला अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे आई, २ मुले, ३ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. योगेश व मंगेश यांचे ते वडील होते.

# कंपनीवर बुलडोझर चालवून गेट, केबीनची केली तोडफोड

### ताबा मारण्याचा प्रयत्न, मुंबईच्या व्यक्तीवर एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर - येथील एमआयडीसीतील एका कंपनीवर बुलडोझर चालवून गेट व सिक्युरिटी केबीन तोडून ताबा मारण्याचा प्रयत्न केल्याचा प्रकार समोर आला आहे. सदरची घटना २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी सातच्या सुमारास घडली असून या प्रकरणी मंगळवारी (दि.१०) एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

व्यावसायिक अर्चना संजय पुगालिया (वय ४९, रा. अरिहंत शांतीविहार सोसायटी, सारसनगर) यांनी फिर्याद दिली आहे. प्रकाश मलय्या शेरेगर (रा. ११० बी तेजपाल इस्टेट, अंधेरी कुर्ला साकीनाका, मुंबई) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. फिर्यादी यांच्या मालकीची नागापूर एमआयडीसीतील प्लॉट बी ९० व बी ५२ येथे कंपनी आहे. २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी सातच्या सुमारास प्रकाश मलय्या शेरेगर व त्याच्या साथीदारांनी फिर्यादी यांचा कायदेशीर ताबा असलेल्या प्लॉटवर कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीरपणे बुलडोझर चालविला. त्याच्या सहाय्याने कंपनीच्या गेटचे व सिक्युरिटी केबीन तोडून नुकसान केले. फिर्यादी व कंपनीतील कामगारांना शिवीगाळ, दमदाटी करून मारहाण केली. प्लॉटचा ताबा घेण्याकरीता धमकी दिली असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक परदेशी करत आहेत.

# अर्बन बँक घोटाळ्याप्रकरणी अजय बोरा यांचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला

नगर - नगर अर्बन कोऑपरेटिव बँकेच्या घोटाळ्याप्रकरणांमध्ये बँकेचे माजी संचालक अजय बोरा यांचा अटकपूर्व जामीन अर्ज येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. एच. शेख यांनी फेटाळून लावला आहे.

अटकपूर्व जामीनासाठी अजय बोरा यांनी न्यायालय मध्ये अर्ज दाखल केलेला होता, त्या अर्जाला फिर्यादी राजेंद्र गांधी यांच्या वतीने ॲड. अभिजीत पुप्पाल यांनी बँकेचा गुन्हा अतिशय गंभीर स्वरूपाचा आहे, या अगोदर ज्या संचालकांचा यामध्ये समावेश होता व त्यांनी न्यायालयामध्ये अर्ज दाखल केला होता त्यांचे जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळून लावले आहे. अजय बोरा हे सुद्धा बँकेचे माजी संचालक आहे. विशेष म्हणजे २९१ कोटी रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणासंदर्भामध्ये ज्या पद्धतीने बँकेच्या संचालक मंडळाने गांभीर्याने या बाबी लक्षात घेऊन वसुली करणे गरजेचे होते ती वसुली केली नाही, म्हणून त्यांच्यावर लेखा परीक्षणामध्ये ताशेरे उडण्यात आलेले होते. एवढेच नाही तर आरबीआयने सुद्धा त्यांच्यावर अशा प्रकारचे ताशेरे ओढले. यामध्ये अजय बोरा हे बँकेच्या ऑडिट रिकव्हरी या कमिटीमध्ये ते सदस्य म्हणून कार्यरत होते, त्यांनी सुद्धा या प्रकारे गांभीर्याने दखल घेतली नाही, तसेच त्यांनी कोणत्याही प्रकारचा विरोध हा केला नाही त्यामुळे ही बाब अतिशय गंभीर आहे. ज्या वेळेला यांनी सर्व नियमांचे उल्लंघन केले म्हणून या बँकेचा परवाना आरबीआयने रद्द केलेला आहे, त्यामुळे सर्वसामान्य ठेवीदारांचे मोठ्या प्रमाणामध्ये व खातेदारांचे हाल झालेले आहे. याला हेच संचालक मंडळ जबाबदार असून यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावावा असा युक्तिवाद त्यांनी न्यायालयामध्ये केला होता.

न्यायालयाने दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकल्यानंतर अजय बोरा यांचा जामीन अर्ज फेटाळून लावला आहे.

## उड्डाणपुलावर कारच्या धडकेत वृद्ध जखमी

नगर - भरधाव वेगात पुण्याकडून छत्रपती संभाजीनगर कडे जाणाऱ्या कारने पुढे चाललेल्या क्टिव्हा मोपेडला धडक दिली. या अपघातात ७० वर्षीय मोपेडस्वार गंभीर जखमी झाला. ही घटना मंगळवारी (दि.१०) उड्डाण पुलावर सहकार सभागृहासमोर घडली.

या बाबतची माहिती अशी की, मेघराज लखुमल मेहतानी (वय ७०, रा. सदर बाजार, भिंगार कॅम्प अ.नगर) हे केडगाव देवी मंदीर अ.नगर येथून देवीचे दर्शन करून त्यांची क्टीव्हा मोपेडवर (क्र. एम. एच १६ बी.जी. ९८५३) उड्डाण पुलावरुन भिंगार कडे जात असताना सहकार सभागृहासमोर त्यांच्या मागुन येणाऱ्या पांढऱ्या रंगाचे कारने त्यांना मागुन जोरात धडक दिली. त्यानंतर ते खाली पडले. या अपघातात त्यांच्या डोक्याचे उजवे बाजुस, उजवा खांदा, उजवा पाय डाव्या हाताच्या मनगटावर मार लागला असुन त्यांच्या क्टीव्हा मोपेड गाडीचे नुकसान झाले आहे.त्यांना धडक देणाऱ्या कारच्या चालकाने त्यांना कसलीही मदत न करता त्याचे वाहन घेऊन त्या ठिकाणाहुन जोरात निघुन गेला. त्यानंतर त्यांना तेथे जमलेल्या लोकांनी औषधोपचार करिता रुग्णालयात नेले. या प्रकरणी मेघराज मेहतानी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# निवेदने देऊन, समक्ष भेटून, तोंडी सांगूनही एम.आय.डी.सी. मधील समस्यांकडे दुर्लक्ष

### मागण्यांची पुर्तता न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा उद्योजकांचा इशारा



नेवासा येथील उद्योजकांच्या वतीने एम.आय.डी.सी.चे उपअभियंता संदिप बडगे यांना निवेदन देवुन त्यांच्याशी विविध समस्यांबाबत चर्चा करण्यात आली.

नगर - एम.आय.डी.सी. मधील उद्योजक व प्लॉट धारक एक वर्षापासून वेळोवेळी निवेदन देऊन, समक्ष भेटून व तोंडी सांगून देखील समस्यांचे निराकारण झालेले नाही. समस्यांचे लवकरात लवकर निराकरण करण्यात यावे, अन्यथा सर्व उद्योजकांना घेवुन तीव्र स्वरुपाचे आंदोलन उभारावे लागेल असा इशारा एम.आय.डी. चे अध्यक्ष योगेश नेहुल यांनी दिला आहे.

अहिल्यानगरच्या नेवासा येथील उद्योजकांच्या वतीने एम.आय.डी.सी.चे उपअभियंता संदिप बडगे यांना निवेदन देवुन त्यांच्याशी विविध समस्यांबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी अध्यक्ष योगेश नेहुल, उपाध्यक्ष अमित कानडे, अनिरुद्ध घैसास, रुपेश नागे, वैभव ससे, निलेश पोखर्णा, गोरक्षनाथ दहातोंडे, समरप्रितसिंग मल्होत्रा, राजु पुंड, संभाजी नाचन, सदाशिवआप्पा बी.आर आदी उद्योजक उपस्थित होते.

यावेळी बोलतांना उद्योजक अनिरुद्ध घैसास म्हणाले की, आम्ही उद्योजक मागण्यांचे निवेदन देत आहोत. रस्त्याच्या दोन्ही बाजूस वेड्याबाभळी व इतर अनावश्यक झाडी वाढलेली आहेत, त्यामुळे वाहतुकीस मोठ्या प्रमाणावर अडथळा निर्माण होत आहे. सर्व रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब व दयनीय झालेली आहे. त्यामुळे दळणवळणास खूप त्रास होत आहे. पर्यायाने त्याचा आमच्या उद्योगावर परिणाम होत आहे. तरी सदरचे सर्व अंतर्गत रस्ते ताबडतोब दुरुस्त / नवीन करावेत जेणेकरून दळणवळण सोयीचे होईल. अनेक भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. पर्यायाने बाहेरून विकत पाणी घ्यावे लागते व नाहक आर्थिक नुकसान होत आहे. रस्त्याच्या कडेला असलेले काही पथदिवे गेल्या अनेक दिवसांपासून बंद आहेत. तरी बंद असलेले दिवे ताबडतोब दुरुस्त करावेत. तसेच उर्वरित भागात नवीन पथदिवे लावण्यात यावेत जेणेकरून रात्रीच्या वेळेस ये जा करण्यास सोयीचे होईल व सुरक्षेच्याबाबत उपयोग होईल. या परिसरात बऱ्याच रस्त्यांच्या कडेला अनाधिकृतपणे टपऱ्या टाकून व्यवसाय करण्यात येत आहे, सदरचे अतिक्रमण ताबडतोब काढावे व ते पुन्हा होणार नाही असा बंदोबस्त करण्यात यावा. या औद्योगिक वसाहतीत एमआयडीसीचे स्वतंत्र्य कार्यालय सुरु करावे, जेणेकरून उद्योजकांना वेळोवेळी संपर्क साधणे सोयीचे होईल. या परिसरात चोऱ्या व खंडणीचे प्रकार होत आहेत यासाठी येथे स्वतंत्र्य पोलीस ठाणे सुरु करावे, जेणेकरून गुन्हेगारीला आळा बसेल. या समस्यांचे लवकरात लवकर निराकारण करून त्या सोडवाव्यात, जेणेकरून येथील उद्योजकांना त्याचा लाभ होईल व आपला व्यवसाय वाढवण्यास मदत होईल. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला. उपअभियंता संदिप बडगे म्हणाले की, आपल्या मागण्यांच्या बाबत आम्ही लवकरच योग्य ती करवाई करु व जे जे शक्य असेल ते ते सर्व प्रश्न मार्गी लावण्यात येतील, असे उद्योजकांना आश्वासन दिले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### लाभदायक नारळाचे खोबरे

सुके खोबऱ्यामध्ये मुबलक प्रमाणात पोषक तत्वे असतात ज्यामुळे आपल्या शरीराला अनेक प्रकारे फायदा होतो. सुक्या नारळात कॅलरी आणि कार्बोहायड्रेट्स भरपूर प्रमाणात असतात. हा एक चांगला उर्जा स्त्रोत आहे आणि थकवा दूर करण्यास मदत करतो.

## पाककला

### लसूण कढी

**साहित्य :** एक कप दही, चार चमचे बेसन, अर्धा चमचा जिरे, १/४ चमचा मेथीदाणे, तीन लवंग, एक कढी कढीपत्ता, एक तमालपत्र, एक लालमिर्ची, दोन हिरव्या मिरच्या बारीक कापलेल्या, बारीक काप केलेला लसूण, अर्धा चमचा आले पेस्ट, १/४ चमचा साखर, हिंग, एक चमचा शुद्ध तूप, बारीक चिरलेली कोथिंबीर

**कृती :** लसूण मिक्सरच्या भांड्यात टाकून यासोबत त्यात आले, हिरवी मिरची आणि कोथिंबीर घालावी. नंतर या सर्व गोष्टी एकत्र करून चांगले बारीक वाटून घ्यावे. आता एका भांड्यात दही आणि बेसन घालून पेस्ट बनवावी. नंतर त्यात लसूण-आले आणि मिरचीची पेस्ट घालून मिक्स करावे. यानंतर एका पातेल्यात बेसनाचे मिश्रण टाकून उकळू घ्यावे. नंतर त्यात मेथीचे दाणे घालावे. आणि सुमारे १० मिनिटे ढवळत राहा. यानंतर एका पातेल्यात तूप टाकून गरम करावे. नंतर त्यात लवंगा, तमालपत्र, हिंग, जिरे, लाल मिरची, कढीपत्ता आणि लसूण घालून परतून घ्या. यानंतर मीठ आणि साखर घालून मिक्स करा. आता बेसन-लसूण मिश्रणामध्ये घालून ४ मिनिटे चांगले उकळून गॅस बंद करा.

## वास्तू

### झाडे कोणती लावावीत?

घरामध्ये निवडुंगाची रोपे लावू नका. जामुन व पेरू वगळता फळझाडे इमारतीच्या हद्दीत नसावीत. त्यामुळे मुलांचे आरोग्य बिघडते. पूर्व आणि उत्तर दिशेला फळांची झाडे लावल्याने मुलांमध्ये वेदना होतात किंवा बुद्धी कमी होते. घराच्या पूर्व किंवा उत्तर दिशेला तुळशीचे रोप लावा. या वनस्पतीचे अतिशय शुभ परिणाम येथे आढळतात.

## सल्ला

अचानक रस्त्यावर पैसे मिळणे हे चांगले लक्षण आहे. तुम्ही ज्या कामासाठी जात आहात त्यात तुम्हाला नक्कीच यश मिळेल.

## सौंदर्य

* फेस मसाज करताना जास्त जोर लावू नका हलक्या हातांनी मसाज करा.
* आठवड्यातून २-३ वेळा चेहऱ्याची मालीश करणे पुरेसे आहे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. १३ डिसेंबर २०२४

**प्रदोष, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, मार्गशीर्ष शुक्लपक्ष, भरणी ०७।५०, कृत्तिका २९।४८, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** आजच्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी आपल्या मित्रांचा व आपल्या कौटुंबिक सभासदांचा सहयोग घ्याल.

**वृषभ :** दिवस अनुकूल व महत्वाचा असेल. आपले अडकेलेले कार्ये पूर्ण होतील. आनंदाची बातमी मिळेल.

**मिथुन :** महत्वपूर्ण व्यक्तींशी संपर्क सुखाचे राहील. राजकीय व्यक्तींसाठी देखील स्थिती सुखदायक राहील.

**कर्क :** नोकरदार व्यक्तींसाठी वातावरण अनुकूल राहील. आरोग्य देखील उत्तम राहील. सामाजिक कार्यात सहभागी व्हाल.

**सिंह :** शत्रूवर्ग निष्प्रभावी राहील. श्रम अधिक झाल्यामुळे दमल्यासारखे वाटेल. वाहने बंद पडतील.

**कन्या :** प्रेयसीशी संपर्क होण्याची शक्यता आहे. मनोरंजनावर खर्च होईल. जोडीदाराला समजावून घ्याल.

**तूळ :** व्यापारासाठी प्रवासाचे योग संभवतात. वैवाहिक जीवनाच्या आनंदात वाढ होईल.

**वृश्चिक :** आरोग्य चांगले राहील. व्यापार-व्यवसायात स्थिती सुखद राहील. आपण सहजरित्या नवीन आव्हाने पेलाल.

**धनु :** उल्हासाचा अनुभव येईल. शीघ्र अनुकूल परिस्थिती होईल. जिभेला सुखावणारा दिवस असेल.

**मकर :** आरोग्य उत्तम राहील. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील. महत्वपूर्ण प्रश्नांचे निराकरण होईल.

**कुंभ :** मनोरंजनावर खर्च होईल. आरोग्य उत्तम राहील. व्यापार-व्यवसायात प्रगती होईल. मित्रांचा सहयोग मिळेल.

**मीन :** एखाद्या ओळखीच्या व्यक्तीबरोबर आपले सामंजस्य वाढेल. आर्थिक गुंतवणुकीतून योग्य तो मोबदला मिळेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**डॉक्टर :** बाई, तुमच्या नवऱ्याच्या सगळ्या टेस्ट झाल्यात आणि सगळेच रिपोर्ट नॉर्मल आले आहेत काही कळतच नाहीये, यांना नेमकं काय झालंय ते?

**बाई (काळजीच्या सुरात) :** अहो डॉक्टर साहेब, ते पोस्ट मार्टम का काय असत, ते तरी करून पहा एकदा!!!

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* मध्यपूर्वेतील कोणत्या देशात वाळवंटाचे साठे नाहीत? - जॉर्डन
* अफगाणिस्तानची लोकसंख्या किती आहे? - ३१ कोटी
* कंबोडीयातील अंगोकर मंदिर कधी बांधले गेले? - बाराव्या शतकाच्या आरंभी
* आशियातील सर्वात मोठे तेल उत्पादक राष्ट्र कोणते? - चीन

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## फिल्मीचक्कर क्र. ११६७ सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) दिल को देखो +++ + ++ चेहरोंने लाखों को लूटाऽऽ (गाणे) ५) ++ देओल (अभिनेत्री) ६) +++ ++ हैं हमे तडपाते हैं (गाणे) ८) ++ अपना और प्रीत परायी (चित्रपटाचे नाव) ९) +++ तेरी कसम (चित्रपटाचे नाव) ११) खोया ++ चाँद खुला आसामाँ (गाणे) १४) ++ ++ फूल खिलें (चित्रपटाचे नाव)

**उभे शब्द :-** १) शाहरूखखान, दीपिका पदुकोण यांचा एक गाजलेला चित्रपट २) ++ जानी (चित्रपटाचे नाव) ३) ++ ++ ++ पैसा फ`को दिल्ली का कुतुबमिनार देखो बंबई शहर की बहार देखो (गाणे) ४) +++ +++ मुझे कोई मिल गया था (गाणे) ७) +++ समझा करो (चित्रपटाचे नाव) १०) +++ अपना अपना (चित्रपटाचे नाव) १२) अमिताभ बच्चन, नितू सिंग, अमजदखान यांचा एक गाजलेला चित्रपट १३) ++ आयेगा मजा (चित्रपटाचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** आपण जे पण आहोत ते, आपल्या विचारांचे फळ आहोत.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### मानवाने पहिल्यांदा कपडे कधी आणि का घालायला सुरुवात केली?

अवशेषांच्या उत्खननावरून असे दिसून येते की मानवाला पृथ्वीवर विचरण करत असताना लाखो वर्षे झाली आहेत. आता प्रत्येकजण नग्न जन्माला आला आहे. त्यामुळे एवढ्या वर्षात अशी एक अवस्था आली असावी की जेव्हा आपण नग्नता सोडून कपडे घालायला लागलो. सुरुवातीला झाडाची साल, जनावरांची कातडी, पाने, वेली इ. पण प्रश्न असा आहे की आपण हे का आणि कधी? लाजाळूपणाने आपण शरीराचे अवयव झाकायला सुरुवात केली का? की दुसरे काही कारण होते?

चीन आणि स्पेनमधील गुहांमध्ये संशोधकांना आठ दशलक्ष वर्षे जुनी दगडापासून बनवलेली काही उपकरणे सापडली. त्यांचा उपयोग प्राण्यांची कातडी सोलण्यासाठी केला जात असे. यावरून असे दिसून येते की आपले पूर्वज म्हणजे होमो इरेक्टस देखील चामड्याचा वापर करत. हे चामडे कपडे म्हणून वापरले जाण्याची शक्यता आहे. पण ते नक्की सांगता येत नाही.

विकासाच्या या वेगात एक लहान शस्त्र ज्याला आपण सुई म्हणतो ते गेम चेंजर ठरले. मला माहित नाही कोण पहिला माणूस असेल ज्याने उपकरणाच्या वरच्या बाजूला छिद्र करून आणि त्यात धागा बांधून वस्तू शिवण्याचा विचार केला असेल. हा शोध फक्त होमो सेपियन्सनेच लावला होता, कारण निएंडरथल्सच्या अवशेषांमध्ये सुईसारखे कोणतेही साधन सापडलेले नाही. आत्तापर्यंतच्या माहितीनुसार, सुईचा शोध सुमारे चाळीस हजार वर्षांपूर्वी लागला होता आणि अंगावर घट्ट बसेल असे कपडे बनवण्यात आम्ही यशस्वी झालो. हवा त्यांच्यात प्रवेश करू शकत नव्हती. याचा अर्थ असा होता की एखादी व्यक्ती थंड वातावरणातही प्रवास आणि काम करू शकते. कपड्यांची ही उपयुक्तता सुमारे १० हजार वर्षांपूर्वीपर्यंत चालू होती. पण त्यानंतर गोष्टी बदलल्या.

सुमारे १० हजार वर्षांपूर्वी हिमयुग संपल्यानंतर कपड्यांच्या वापरात बदल झाला. पूर्वीचे कपडे फक्त थंडीपासून बचावासाठी वापरले जायचे. पण जसजसा उष्णता वाढत गेली तसतसे त्यांचे सामाजिक महत्त्वही बदलले. उबदार कपड्यांऐवजी, मानवांनी हलके कपडे वापरण्यास सुरुवात केली. आणि आज ज्या कपड्यांना आपण कपडे म्हणतो त्या कपड्यांना सुरुवात झाली. उदाहरणार्थ, कापूस, रेशीम इत्यादी, ज्यांना कपडे बनवण्यासाठी विणकाम आवश्यक आहे. बहुधा याच गरजेपोटी कापूस इ.ची लागवड सुरू झाली. जसजशी मानवी संस्कृती पुढे विकसित होत गेली. कपड्यांची भूमिका वाढत गेली आणि हा प्रवास वर्तमानापर्यंत पोहोचला. जिथे कापड ही केवळ अंग झाकण्याची वस्तू राहिली नाही, तर ती आपल्या सामाजिक स्थितीचे, आपल्या व्यवसायाचे, प्रत्येक गोष्टीचे प्रतीक बनले. एकूण काय तर मानवाने सुमारे १ लाख वर्षांपूर्वी कपडे वापरण्यास सुरुवात केली. यावेळी थंडीपासून बचाव करण्यासाठी प्राण्यांचे कातडे घालणे ही पहिली गरज बनली. हिमयुगात माणसांनी थंडीपासून बचाव करण्यासाठी प्राण्यांची कातडी शिवून कपडे विकसित केले. सुमारे ४०,००० वर्षांपूर्वी, मानवाने कपडे शिवण्यासाठी हाडांच्या सुया वापरण्यास सुरुवात केली. या सुया एक उत्तम शोध होता. कपड्यांमध्ये राहणाऱ्या उवांच्या डीएनएचा अभ्यास करून, शास्त्रज्ञांनी शोधून काढले की सुमारे ७०,००० वर्षांपूर्वी कपडे वापरले जात होते. सुरुवातीला थंडी, उष्णता आणि प्राण्यांपासून बचाव करण्यासाठी कपडे घातले जायचे. नुसते अंग झाकण्याचे साधन न राहता काळानुसार कपडे हे समाजाचे, संस्कृतीचे आणि अस्मितेचे प्रतीक बनले. कपडे ही आदिम मानवाची गरज असताना आज ते फॅशन आणि स्टाइलचा भाग बनले आहेत.

## अती लोभाचे फळ

एकदा एक कोल्हा एक गावातून जात होता. त्याने गावाजवळच्या बाजारात लोकांची गर्दी जमलेली पाहिली. कुतूहल म्हणून कोल्हा काय झाले हे पाहण्यासाठी त्या गर्दीजवळ गेला. कोल्ह्याने पाहिले की, दोन शेळ्या एकमेकांशी भांडत होत्या. दोन्ही शेळ्या खूप मजबूत होत्या, त्यामुळे त्यांच्यात जोरदार भांडण झाले होते. सर्व लोक मोठ्याने ओरडून टाळ्या वाजवत होते. दोन्ही शेळ्या मोठ्या प्रमाणात रक्तबंबाळ झाल्या होत्या आणि रक्तही रस्त्यावर वाहत होते.

इतकं ताजं रक्त पाहून कोल्ह्याला स्वतःवर नियंत्रण राहिले नाही. त्याला फक्त त्या ताज्या रक्ताचा आस्वाद घ्यायचा होता आणि शेळ्यांचा फडशा पडायचा होता. कोल्ह्याने त्यांच्यावर झेप घेतली. पण कोल्ह्याला लक्षात आले नाही की, दोन्ही शेळ्या खूप मजबूत होत्या. शेळ्यांची कोल्ह्याला मारहाण केल्याने कोल्हा जागीच मरण पावला.

तात्पर्य : अति लोभ हा संकटाचे दरवाजे उघडत असतो.

## रहमते दर्शन (भाग - १)



### महाराज का प्रेम

एलिज़ाबेथ बाउनिंग की एक कविता की बहुत ख़ूबसूरत पंक्ति है जो ये कहती है. How do I love thee? Let me count the ways अपने प्रीतम से मैं कैसे प्रेम करूँ ? वो तरीके मुझे गिनने दो । कविता की यह लाइन दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज की ज़िन्दगी पर पूरी तरह से लागू होती है, हम सबकी यादों में उनके असंख्य तरीकों की यादें ज़रूर होंगी, जिनसे वो हमें प्रेम करते थे। ये यादें हमेशा हमारे दिलो-दिमाग में ताज़ा रहती हैं और जब हम मुश्किलों और परेशानियों के दौर से निकल रहे होते हैं, तो ये यादें हमारा मार्गदर्शन करती हैं।

संत दर्शनसिंह जी महाराज ऐसे महापुरुष थे, जिन्होंने हमें दिखाया कि अपने साथियों से कैसे प्यार किया जाता है। जो भी उनके दर पर आया उसने उनके प्यार को महसूस किया। जो लोग उनके साथ काम करते थे वो महसूस करते थे कि वे उनसे बेहद प्रेम करते थे। उनके परिवारजनों एवं दोस्तों का कहना था कि वो उनसे प्रेम करते थे। यहाँ तक कि अजनबी लोग, जो उन्हें एक बार मिले व दूर चले गये, वो भी दूसरों को बताते थे कि जो प्यार उन्हें उनसे मिला, ऐसा प्यार उन्होंने अपनी जिन्दगी में कभी भी किसी से नहीं पाया। उनके प्यार का रहस्य क्या था? वे क्या करते थे जिससे अनगिनत रूहें महसूस करती थीं कि वो उनसे ही सबसे ज़्यादा प्यार करते थे। आइए देखें वो कौन से असंख्य तरीके थे जिनसे वो प्यार करते थे और उनसे सबक लें ताकि हम सब भी अपनी जिन्दगी में उसी प्यार को करने की योग्यता को धारण कर सकें।

सबसे पहली चीज़ जो वो करते थे, वो इंसान के दिलो-दिमाग़ और रूह की गहराइयों तक जाते और उसे समझ जाते थे। वो जान जाते थे कि वो क्या सोच रहा है, क्या महसूस कर रहा है। फिर महाराज जी उससे उसी के स्तर पर उसकी जरूरतों के बारे में बातचीत करते थे ।

जो लोग उनके साथ होते थे, वो महसूस करते थे कि उनकी बातों को सुना जा रहा है। उनको समझने के लिए महाराज जी बड़े धैर्य और दयालुता से, सहानुभूति से उनकी सारी बात सुनते थे। वो जानते थे कि प्रत्येक व्यक्ति को क्या चाहिये, उसकी क्या ज़रूरत है और उसकी क्या इच्छायें हैं। महाराज जी उसको ये महसूस करवा देते थे कि वो उन्हें समझ गये हैं और उसी नज़रिए से वो उनकी प्रार्थनाओं का उत्तर देते थे। जो मदद उन्हें चाहिये होती थी, वो लेकर लोग जब उनके द्वार से वापस आते थे, तो ये महसूस करते थे कि उनके सिर से कोई बोझ हट गया है। वो सब सन्तुष्ट होकर जाते थे।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### अंतरीक बल

जितना प्यार भरे शब्द बोलेंगे उतना ही प्यार बना रहेगा। कभी भी कटु शब्द नहीं बोलने हैं, चाहे कुछ भी हो जाए। जैसे ही हम स्नेही को कटुवचन बोलते हैं, मजाक करते हैं, नीचा दिखाते है, बुरा व्यवहार करते हैं, स्नेही व्यक्ति मन से हट जाता है। वह हमें मन से स्नेह देना बंद कर देता है। जब हमें प्यार नहीं मिलता है तो हम झगड़ते हैं। एक दूसरे पर हाथ उठाते हैं। प्रत्येक व्यक्ति अपनी तारीफ सुनना चाहता है। विपरीत हलातों में भी दूसरे की तरीफ के बहाने ढूंढने हैं। जिस से स्नेह है उसे समय दें वह चाहे कुछ पलों का हो। जब स्नेह नहीं होता है तो हम कहते हैं मैं बहुत बिजी हूं। यह बिजीपन कुछ नहीं एक बहाना है जिस से स्नेह होता है उसके लिए समय की कमी नहीं होती। अगर हम मन में दूसरों के प्रति प्यार रखें तो यह संसार स्वर्ग बन सकता है।

समय प्रबन्धन और प्यार

भोजन शरीर के लिए जरूरी है। अगर भोजन का ध्यान न रखें तो सारी जिंदगी हम बीमारियों से जूझते रहेगें और बहुत सारा अमूल्य समय अच्छे कार्यों में नहीं दे सकेंगे। ऐसे ही प्यार मन का भोजन है। प्रत्येक जगह चाहे वह घर हो, कार्य स्थल हो, धार्मिक स्थल हो, समाजिक स्थल हो, शिक्षा का स्थान हो, चिकित्सा का स्थान हो, वहां जो लोग काम करते हैं, उनकी मूलभूत जरूरत प्यार है। अगर इन स्थानों पर प्यार नहीं होगा तो अमूल्य समय लड़ाई और संघर्ष में बीतता है। अगर आपस में प्यार न हो तो मित्र या कुटुम्बीजन हमारा जितना समय खराब करते हैं, उतना शत्रु भी नहीं करते। इसलिए स्नेही का ध्यान रखो। उसके खाने पीने, वस्त्र, जूतों या अन्य आवश्यकताओं का ध्यान रखें। स्नेही लोगों को आर्थिक रूप कभी टाईट न रखें। स्नेही लोग जो आप पर निर्भर हैं। उसे कभी ताना नहीं मारना। तुझे यह दिया वह दिया, यह खिलाया वह खिलाया, यह सब प्यार के कम होने की निशानी है। जब हम किसी दूसरे से प्यार करते हैं तो अपेक्षाएं पाल लेते हैं। रिश्ता मधुर तभी बनता है जिस में प्यार, लगाव, अपनापन के साथ साथ थोड़ा स्पेस भी हो। ज्यादा अपनेपन की भावना घुटन पैदा करती है। एक दूसरे को स्वतंत्रता का अधिकार है। सम्बन्धों की दूसरों से तुलना न करें। अपने हर दिन को भूतकाल में न घसीटते रहें। तुलना सम्बन्धों में दरार डाल देती है। सम्बन्धों में ईर्ष्या को न आने दें। एक दूसरे पर पैसा कमाने का ताना न मारे। कभी बहस न करें। एक दूसरे के परिवार के लोगों पर टीका टिप्पणी न करें। ईगो सारे रिश्तो को खत्म कर देती है। जब उम्मीदें पूरी नहीं होती तो गहरी चोट लगती है। उम्मीदें न पाले।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### गर्भवतींसाठी सुनियोजित दिनक्रम

वारंवार मंत्र म्हटल्याने गर्भस्थ बाळाला तो मंत्र ओळखीचा वाटतो व प्रसूतीनंतर तो मंत्र म्हटल्यास बाळ रडायचे थांबते. एकूणच पूजाअर्चेतून सात्त्विक वातावरण तयार होऊन बाळावर आध्यात्मिक संस्कार होतात. गर्भवतीलादेखील यातून मनःशांती मिळते. याचे विशेष मार्गदर्शन स्तोत्र व मंत्रोपचार प्रकरणामध्ये केलेले आहे. ८. घरातील कामे (९.३० ते ११.०० पर्यंत) : घरातील स्वयंपाक किंवा इतर कामे करावीत. कामे करीत असताना गर्भसंस्कार सीडी, शास्त्रीयसंगीत, भक्तीसंगीत, तानपुरा, बासरीवादन यांची सीडी लावावी.

९. दुपारचे जेवण (११.०० ते १२.००) : दुपारचे जेवण परिपूर्ण असावे. जेवणामध्ये काय पदार्थ खावेत हे आपण आहारामधील तक्ता पाहून ठरवावे. जेवण ताजेच जेवावे. शिळे पदार्थ, शिळे अन्न खाऊ नये. शांतचित्ताने बाळाच्या व स्वतःच्या शरीराच्या पोषणाचा विचार करूनच जेवण करावे. अति घाई, अति बडबड, अति चिडचिड करत जेवण करू नये. जेवण झाल्यावर पानपसंद विडा खावा; त्यामुळे खाल्लेले अन्न पचण्यास मदत होते. **१०. कला जोपासणे (१२.०० ते १.००) :** जेवण घेतल्यानंतर लगेचच आराम करू नये, कारण खाल्लेले अन्न ढेकर येणे, मळमळ, उलटी होणे असा त्रास होऊ शकतो; म्हणून थोडी बरोबर एखादा आवडता छंद जोपासावा. विणकाम, भरतकाम, चित्र काढण, एखादे पुस्तक वाचणे असे छंद जोपासावेत. कुठलेही काम करताना तान सीडी सौम्य आवाजात चालू ठेवावी; यामुळे मन प्रसन्न राहते व मनाने करू नये, कारण खालेले अन्न घशाशी येऊन अपचन सहाऊ शकते; म्हणून थोडी शतपावली करावी.

* कुठलेही काम करताना तानपुरा, बासरीवादन यांची राहतात. मन मन प्रसन्न राहते व मनामध्ये सकारात्मक विचार येतात.
* फळ खावे (२.०० वा.) : ऋतुनुसार एखादे फळ खावे.
* दुपारची विश्रांती (२.३० ते ४.००) : दीड तास मन शांत ठेवून विश्रांती घ्यावी. झोपण्याआधी एखाद्या चांगल्या पुस्तकाची दोन-तीन पाने तरी वाचावीत; त्यामुळे शांत झोप लागते. झोपताना शक्यतो एका अंगावर होऊन वरील गुडघ्याखाली उशी घेऊन वामंगासन स्थितीत झोपावे. या स्थिती मुळे पोटावर ताण पडत नाही व आरामदायकदेखील वाटते.
* पेयपान (दुपारी ४.०० वा.) : झोपेतून उठल्यानंतर चेहरा, हात, पाय स्वच्छ धुवावेत; त्यामुळे मन ताजेतवाने, प्रसन्न व आनंदी होते, सकाळपासून आलेला थकवा दूर होतो. नंतर आवळा सरबत किंवा लिंबू-गूळ असे एखादे सरबत शांतपणे प्यावे. बाहेरील शीतपेयापेक्षा घरी बनविलेले सरबत पिणे बाळासाठी व तुमच्या आरोग्यासाठी चांगले असते. या सरबतामधून व्हिटॅमिन सी मिळते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



जिल्हास्तरीय स्पर्धेत पदके पटकाविणारे टिम टॉपर्सच्या स्केटिंग खेळाडू तसेच त्यांचे मार्गदर्शक शिक्षक.

# टिम टॉपर्सच्या स्केटिंग खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेत पदकांची भरारी

नगर – नुकत्याच अहिल्यानगर, भिंगार येथे झालेल्या टिम ऐम स्पोर्ट्स अकॅडमी आयोजित जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेत टिम टॉपर्स स्केटिंग अकॅडमीच्या खेळाडूनी सुवर्ण, रौप्य, कांस्य पदकांची लयलूट केली. या स्पर्धा भिंगार प्रियदर्शिनी स्कूल येथे घेण्यात आल्या.

या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध तालुका, शाळा, अकॅडमीच्या खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. सादर स्पर्धेत इनलाईन, क्वाड, टेनासीटी, इत्यादी. प्रकारात स्पीड रेस घेण्यात आल्य. यामध्ये टीम टॉपर्सचे पदक विजेते. खेळाडू पुढीलप्रमाणे सुवर्णपदक जय भंडारी, श्रीशा दळवी, कार्तिक नन्नवरे, इशिका वाघुळकर, ईश्वरी आव्हाड, जागृती बागल, रुद्र निकाम.

रौप्यपदक – विआन मुथा, क्षितिज बोरा,शिव दळवी, इशांत देशमुख.

कांस्यपदक – आदर्श बिश्वास, सोहम शिंदे, वैभव पाटोळे, शौर्य ढगे, आलोक पवार. तर तसेच इंद्रनील दळवी, शिवांश राठोड, देवांश राठोड, आरूष चगेंडे, पार्थ गांधी यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.

या खेळाडू पैकी अंतरराष्ट्रीय खेळाडू कु. कार्तिक नन्नवरेने सुवर्णपदकाची कमाई करत स्केटिंग खेळाच्या उत्कृष्ट प्रदर्शन करीत लक्षवेधी कामगिरी केली.

सर्व खेळाडूंचे माजी उपमहापौर गणेश भोसले, जिल्हा क्रिडा कार्यालयातील क्रिडा अधिकारी प्रियांका खिंडारे, जिल्हा रोलबॉल संघटनेचे अध्यक्ष प्रदीप पाटोळे, जिल्हा टेनिस क्रिकेट संघटनेचे सचिव सचिन गायकवाड व अध्यक्ष अविनाश काळे, संघटन सभासद शिवाजी राठोड यांनी कौतुक करत अभिनंदन केले.

सर्व खेळाडू प्रशिक्षक आंतराष्ट्रीय खेळाडू प्रशांत पाटोळे व सहप्रशिक्षक पियुष कदम यांच्या मार्गदर्शनाखाली बुरुडगाव रोड येथील कै. पुंडलिकराव स्केटिंग रींक तसेच जिल्हा क्रिडा संकुल वाडीया पार्क येथे स्केटिंग सराव करतात.

# ‘जिल्हा युवा महोत्सवात’ गौरव भुकन जिल्ह्यात प्रथम

## विभागीय स्तरावर तृतीय क्रमांकाने यशस्वी



पुणे नाशिक आणि अहिल्यानगरमधून निवडलेल्या युवकांमधून विभागीय स्तरावर कथालेखन स्पर्धेत गौरव भुकन तृतीय क्रमांक प्राप्त झाल्याबद्दल सोलापूर येथे सन्मान स्वीकारताना.

नगर – सन २०२४ – २५ या वर्षांतील जिल्हास्तर युवा महोत्सवांचे आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व नेहरु युवा केंद्र, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सीएसआरडी समाजकार्य महाविद्यालय, अहिल्यानगर यांच्या सहकार्याने ५ ते ६ डिसेंबर या कालावधीत सीएसआरडी समाजकार्य महाविद्यालय, अहिल्यानगर येथे भरवण्यात आला होता. यात जिल्ह्यातील युवकांनी सहभाग नोंदवला.

विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना Innovation on Science and Technology यात कथालेखन स्पर्धेत जिल्हास्तर युवा महोत्सवांत येथील भाऊसाहेब फिरोदिया ज्युनिअर कॉलेजचा विद्यार्थी चि. गौरव विजय भुकन याने प्रथम क्रमांक प्राप्त करून यश मिळवले. ९ व १० डिसेंबर रोजी सोलापूर येथे विभागीय स्पर्धेत नगर, पुणे आणि नाशिक जिल्ह्यातील निवड झालेल्या युवकांमधून कथालेखन स्पर्धेत गौरवने तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले आहे. तर संस्कार भारती पश्चिम प्रांत अहिल्या नगर आयोजित जिल्हास्तरीय सुगम गायन स्पर्धेतही गौरवने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

विविध स्पर्धांमधील त्याच्या यशामुळे राज्य क्रीडा मार्गदर्शक ज्ञानेश्वर खुरंगे, प्रा. सॅम्युअल वाघमारे, शब्दगंध साहित्यिक परिषदेचे सुनील गोसावी, कवयित्री शर्मिला गोसावी, वर्षा भोईटे यांनी गौरवचे अभिनंदन केले आहे.



आ.काशिनाथ दाते यांची चैतन्य ट्रॅव्हल्सला भेट दिली असता त्यांचा सत्कार करताना किशोर मरकड आदी.

# आमदार काशिनाथ दाते यांची चैतन्य ट्रॅव्हल्सला भेट

नगर – चैतन्य पब्लिसिटी व ट्रॅव्हल्स या उद्योगसमूहाला पारनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी सदिच्छा भेट दिली. त्यावेळी संचालक पत्रकार किशोर मरकड यांनी आमदार दाते यांचा सत्कार केला.

यावेळी ते म्हणाले की किशोर मरकड आणि माझा जुना ऋणानुबंध आहे एक बहुजन समाजातील ग्रामीण भागातून येऊन या तरुणाने केलेला प्रवास हा नव्या पिढीला प्रेरणादायी आहे. त्यांचे वडील प्राचार्य स्वर्गीय एम एस मरकड हे माझे अत्यंत जिव्हाळ्याचे कौटुंबिक मित्र होते. त्यांचे संस्कार मला लाभले आज माझ्यासारख्या सर्वसामान्य माणसाला पारनेर विधानसभेतील जनतेने विश्वासाने विधिमंडळात पाठवले आहे त्या विश्वासाला मी तडा जाऊ देणार नाही.

यावेळी किशोर मरकड यांनी दाते सरांच्या शैक्षणिक राजकीय व सामाजिक प्रवासाचा उजाळा करून दिला. यावेळी आमदार दाते यांच्या समवेत त्यांचे सहकारी, डॉ.रोहिदास चौधरी, सहसंचालक शिवतेज मरकड, ओंकार ट्रॅव्हल्स संचालक नितीन मरकड, सहव्यवस्थापक अमित कोंडा, अभिजीत जोशी, मयुरी देशपांडे आदी उपस्थित होते.

# गुरूनिष्ठेची प्रेरणा देणारी नाथांची दत्तभक्ती

## प्रवचनकार मिलिंद चवंडके यांच्या अमृतवाणीने श्रोते मंत्रमुग्ध



नाना महाराज मठात २३२ व्या अखंड हरिनाम सप्ताहातील प्रवचन सोहळ्याचे व्दितीय पुष्प गुंफताना प्रवचनकार मिलिंद चवंडके.

नगर – भगवान विष्णूंच्या आदेशावरून नवनारायणांनी नवनाथ म्हणून अवतार धारण करत केलेली दत्तभक्ती ही गुरूनिष्ठेची प्रेरणा देणारी, गुरूनिष्ठेचा आदर्श उभा करणारी, गुरूनिष्ठेशी समरस कसे व्हावे याचा कृतीशील संदेश देणारी आहे, असे प्रतिपादन नाथ संप्रदायाचे संशोधक तथा प्रवचनकार मिलिंद चवंडके यांनी केले.

दिल्लीगेटजवळील नाना महाराज मठात सुरू असलेल्या २३२ व्या अखंड हरिनाम सप्ताहातील प्रवचन सोहळ्याचे व्दितीय पुष्प गुंफताना नाथांची दत्तभक्ती या विषयावर ते बोलत होते.

श्री.चवंडके पुढे म्हणाले, आदिनाथ भगवान शंकर परमात्म्याकडून मिळालेले ज्ञान मच्छिंद्रनाथांनी भगवान श्रीदत्तात्रेयांच्या अनुग्रहानंतर नाथ संप्रदायाच्या माध्यमातून जनसामान्यांच्या पुढ्यात ठेवले. गुरू गोरक्षनाथांनी गहिनीनाथांना आणि गहिनीनाथांकडून निवृत्तीनाथांनी ज्ञानेश्वर माऊलींना हेच आत्मज्ञान प्रदान केले. वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून आज घराघरात हे ज्ञान पोहोचले. हे ज्ञान म्हणजे नाथांच्या दत्तभक्तीमधून प्रगटलेले दिव्यदर्शनच होय. आदिनाथ भगवान शंकर परमात्म्यापासून ज्ञान आणि भगवान श्रीदत्तात्रेयांचा उपदेश ही ज्ञानोत्तर भक्ती होय. गुरूभक्ती, योगसाधना व ज्ञान यांचा त्रिवेणी संगम नवनाथ भक्तिसार ग्रंथात झाला आहे. श्रीनृसिंह सरस्वतींच्या चमत्कारांची गाथा म्हणजे श्रीगुरूचरित्र आणि नवनाथांनी केलेल्या चमत्कारांची गाथा म्हणजे नवनाथ भक्तिसार ग्रंथ आहे.

आपल्या देहाच्या सहाय्याने परमपदाची प्राप्ती करून घ्यायची असल्याने देहाचे उत्तम रक्षण करावे. आरोग्य सांभाळावे. देह शुध्द ठेवण्यासाठी शुध्द शाकाहारी आणि निर्व्यसनी असावे. शुध्द आचरण व चारित्र्यसंपन्नता आपणास भगवंतापर्यंत घेऊन जाते. सद् गुरू भेटले की अध्यात्म मार्गावर चालण्याचा मार्ग प्रशस्त होत जातो. आपण परगावी जाण्याची जशी जय्यत तयारी करतो तशी तयारी भगवंताकडे पोहोचण्यासाठी केली पाहिजे. गुरूभक्तीने ही तयारी घडते, असे मिलिंद चवंडके यांनी विविध दाखले देत निरूपण करताना सांगितले.

प्रवचन सोहळ्यास भगवान देशमुख, सी.ए. संजय देशमुख, अविनाश धर्माधिकारी, पद्माकर देशमुख, वैद्य विलास जाधव, रणजित रासकर, राजेंद्र भागानगरे, राजेंद्र परदेशी, गोविंदराव मिसाळ, सर्वोत्तम क्षीरसागर, सोन्याबापू मुदळ, सौ.सोनाली चवंडके, सुनंदा पानसरे, सौ.राणी भागानगरे यांच्यासह शहराच्या उपनगरातील भाविक आणि नाथभक्त उपस्थित होते. सामुदायिक पसायदानाने प्रवचन सोहळ्याची सांगता करण्यात आली. दत्तजयंती सोहळ्यात प्रथमच नाथांची दत्तभक्ती या विषयावर प्रवचन ऐकायला मिळाले, असे श्रोत्यांनी आयोजक देशमुख परिवारास आणि प्रवचनकार मिलिंद चवंडके यांना खास भेटून सांगितले. प्रवचन करताना चवंडके यांनी उच्चस्वरात केलेला नाथांच्या नावांचा गजर वातावरण मंत्रमुग्ध करून टाकणारा आणि उपस्थितांच्या अंगावर रोमांच उभा करणारा ठरला.





गीता परिवार दक्षिण अहिल्यानगर या संस्थेच्या वतीने गीता जयंतीच्या निमित्ताने शहरातील चितळे रोड, ऋग्वेद भवन येथे एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# अहिल्यानगर शहरात गीता जयंती उत्साहात साजरी

नगर – गीता परिवार दक्षिण अहिल्यानगर या संस्थेच्या वतीने ११ डिसेंबर रोजी गीता जयंतीच्या निमित्ताने शहरातील चितळे रोड, ऋग्वेद भवन येथे एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये गीतेच्या १८ अध्यायाचे सलग पठण केले गेले.

उपक्रमाला शुभेच्छा देण्यासाठी आणि गीता पठणाचा आनंद घेण्यासाठी आर.एस.एस. च्या प्रज्ञा बापट व अच्युतराव पिंगळे यांच्यासह १५० ते २०० लोक कार्यक्रमस्थळी उपस्थित होते. एका तालासुरात होत असलेल्या या गीतापठणाने वातावरणात अतिशय भक्तीपूर्ण, मांगल्यमय झाले होते.

यावेळी ज्यांना गीतेचे १८ अध्याय कंठस्थ आहे, अशा गीताव्रतीचा सत्कार करण्यात आला. सत्कार मूर्तिमध्ये सौ. सुनंदा रविंद्र सोमाणी, शुभदा गोडबोले, रजनी बेल्हेकर, छाया पडवळ, सुनंदा सुपेकर, मंगला वैद्य, कमल आढाव, वृंदा जोशी, संगीता जाधव, हरिप्रिया खंडेलवाल (वय ९), निकुंज राठी (वय १०) यांचा गीतापरिवार च्या कार्यकर्त्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

गोविंद देवगिरीजी महाराज (किशोरजी व्यास) यांच्या प्रेरणेने स्थापन झालेला गीता परिवार, या परिवाराला पुढे घेऊन जाण्यासाठी गीता परिवाराचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांची सर्वात महत्त्वाची भूमिका आहे.

गीता परिवाराच्या जिल्हाध्यक्ष सुनंदा सोमानी म्हणाल्या की सत्कार मुर्तीमध्ये ९ वर्षाच्या चिमुकल्यांपासून सत्तर वर्षांच्या आजी–आजोबांचा समावेश आहे. गीता शिकण्याला वयाचे कुठलेही बंधन नाही हेच यावरून सिद्ध होते, तुम्ही कुठल्याही वयात गीता आत्मसात करु शकता आणि प्रत्येकाने गीता आत्मसात करायलाच हवी.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. हेमा सारडा यांनी केले. भगवद्गीतेच्या आरतीने कार्यक्रमाची सांगता झाली.

गीता परिवाराचे कार्यकर्ते स्नेहलता सोमाणी, अलका नावंदर, अर्चना जोशी, दीपा शर्मा, प्रतिभा बजाज, दुर्गा जाजू, श्रुती गुगळे, गीता बिहाणी, ज्योती कुलकर्णी, विधी जाजू उपस्थित होते.

# विजय दिवस अल्ट्रा मॅरेथॉनमध्ये डॉक्टर उद्धव शिंदे यांचा सन्मान



स्नेहबंध फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांचा गौरव करताना मिलिटरी हॉस्पिटलच्या ब्रिगेडियर वाणी सूर्यम.

नगर – भारतीय लष्कराच्या मुख्यालय दक्षिण कमांडच्या नेतृत्वाखाली आयोजित विजय दिवस अल्ट्रा मॅरेथॉन मध्ये सहभागी धावपटूंचे अहिल्यानगरमधील किल्ला गार्डन येथे स्वागत करण्यात आले. या सोहळ्यात स्नेहबंध फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांचा मिलिटरी हॉस्पिटलच्या ब्रिगेडियर वाणी सूर्यम यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

पुणे येथे १५ जानेवारी २०२५ रोजी आयोजित सैन्य दिवस कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर ४०५ किमीच्या प्रवासाचा एक भाग असलेल्या या मॅरेथॉनचे आयोजन १९७१ च्या भारत–पाक युद्धातील भारतीय सैन्याच्या दैदिप्यमान विजयाचे स्मरण करण्यासाठी आहे. अल्ट्रा मॅरेथॉन नगरमध्ये आल्यानंतर मिलिटरी हॉस्पिटलचे ब्रिगेडियर वाणी सूर्यम यांनी धावपटूंचे स्वागत केले. यावेळी सामाजिक कार्याबद्दल डॉ. उद्धव शिंदे यांचा ब्रिगेडियर वाणी सूर्यम यांनी शाल व सन्मानचिन्ह देऊन गौरव केला. यावेळी टुरीस्ट गाईड अमोल बास्कर उपस्थित होते. डॉ. उद्धव शिंदे हे नि:स्वार्थ भावनेने समाजातील वंचित, निराधार, वृद्धांच्या आरोग्यासाठी तसेच गरीब मुलांच्या शिक्षणासाठी काम करतात. पर्यावरण संवधर्नासाठीही त्यांचा पुढाकार आहे. या कार्याची दखल घेत त्यांचा हा गौरव करण्यात आला.




अविष्कार २०२४–२५ संशोधन स्पर्धेत आयबीएमआरडीच्या ३ प्रकल्पाची निवड करण्यात आली.

# अविष्कार २०२४–२५ संशोधन स्पर्धेत आयबीएमआरडीच्या ३ प्रकल्पाची निवड

नगर – डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनच्या आय बी एम आर डी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे अंतर्गत घेण्यात आलेल्या ’अविष्कार २०२४–२५ च्या क्षेत्रस्तरीय संशोधन स्पर्धेत नेत्रदीपक यश मिळवले. या स्पर्धेत शरयू काळे, प्रथम दुर्योधन, तुषार जमधाडे आणि केतन हेलोडे यांच्या संशोधन प्रकल्पाची विद्यापीठस्तर स्पर्धे साठी निवड करण्यात आले असल्याची माहिती संचालक डॉ. संजय धर्माधिकारी यांनी दिली.

स्पर्धेत विद्यार्थ्यांनी महत्वाच्या सामाजिक प्रश्नांवर प्रकल्प सादरीकरण केले. जसे कि महिला सुरक्षतेसाठी ॲप, बायोमेट्रिक बेस वोटिंग सिस्टिम व सूर्यप्रकाशावर चार्ज होणारी इलेक्ट्रिक वाहन. विद्यार्थ्यांमध्ये नवसंशोधनात्मक वृत्ती वाढीला लागावी व प्रत्येक क्षेत्रात नाविन्यपूर्ण संशोधन व्हावे, या उद्धेशाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर अशा स्पर्धाचे आयोजन केले जाते. अविष्कार २०२४–२५ मध्ये एकूण ३ प्रकल्पाची निवड झाली असून या ५ विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

संस्थेचे अध्यक्ष आ. राधाकृष्ण विखे पाटील, विश्वस्त व मुख्य अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेचे सेक्रेटरी जनरल डॉ. पांडुरंग गायकवाड, मेडिकल कॉलेज व हॉस्पटलचे संचालक डॉ. अभिजित दिवटे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# एस के ॲकॅडमी आयोजित अहिल्यानगर प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत गॅलेक्सी नॅशनल स्कूल विजेता तर आर एल टायटन्स संघ उपविजेता



एस के ॲकॅडमी आयोजित अहिल्यानगर प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत गॅलेक्सी नॅशनल स्कूल विजेता तर आर एल टायटन्स संघ उपविजेता ठरला. (छाया – लहू दळवी)

नगर – वाकोडी येथील साईदीप मैदानावर एस के क्रिकेट ॲकॅडमीच्या वतीने १६ वर्षाखालील खेळाडूंसाठी अहिल्यानगर प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा झाली असून अंतिम सामना गॅलेक्सी नॅशनल स्कूल संघ आणि आर एल टायटन्स संघामध्ये झाला यात गॅलेक्सी नॅशनल स्कूल संघाने नाणेफेक जिंकत २० ओव्हरमध्ये ११३ धावांचे आव्हान उभे करत आर एल टायटन्स संघाला ६३ धावात ऑलआऊट करत गॅलेक्सी नॅशनल संघाने ५० धावाने अंतिम सामना जिंकत अहिल्यानगर प्रीमियर लीग विजेता संघ ठरला आहे. ही स्पर्धा उत्साहात दहा दिवस साखळी पद्धतीने खेळली असून जिल्हाभरातील १४० खेळाडू सहभागी झाले होते. एस के क्रिकेट ॲकॅडमीच्या माध्यमातून खेळाडूंसाठी बालवयातच क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करीत आपल्या कलागुणांना वाव देण्यासाठी हक्काचे व्यासपीठ निर्माण करून दिले जाते, स्पर्धेतून खेळाडू घडला जात असतो असे प्रतिपादन संदीप आडोळे यांनी केले.

वाकोडी येथील साईदीप मैदानावर एस के क्रिकेट ॲकॅडमी आयोजित १६ वर्षाखालील अहिल्यानगर प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे विजेता गॅलेक्सी नॅशनल स्कूल व उपविजेता आर्यन टायटन संघाला पारितोषिक वितरित करताना संदीप आडोळे, संदीप घोडके, सम्राट देशमुख, अजय कविटकर, सार्थक ख्रिस्ती, प्रदीप पासवान, ऋषिकेश सुंबे, पंच सागर बनसोडे, सय्यद हमजा आदी उपस्थित होते.

एस के क्रिकेट अक्ॅडमी नेहमीच जिल्हाभरातील चांगल्या क्रिकेट खेळाडूंना एकत्रित करत विविध स्पर्धेचे आयोजन करत असतात यावेळी अहिल्यानगर प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करीत आठ संघामध्ये १४० खेळाडू साखळी पद्धतीने खेळविले असून सर्व सामाने अटीतटीचे झाले खेळाडूंनी देखील आपला खेळ सिद्ध करत प्रेक्षकांची मने जिंकली, फायनल संघाचा मॅन ऑफ द मॅच रोशन शेख ठरला तर मॅन ऑफ द सिरीज तनिष्क उदावंत ठरला असून त्याला सायकल भेट देत सन्मानित करण्यात आले. बेस्ट बॅटमॅन तन्मय गायकवाड यांनी ६ सामन्यांमध्ये २४० धावा फटकेविल्या तर बेस्ट बॉलर यश घोगरे यांनी ४ सामन्यांमध्ये १२ विकेट मिळविल्या तर बेस्ट फिल्डर म्हणून रोशन शेख याला सन्मानित करण्यात आले आहे अशी माहिती अजय कविटकर यांनी दिली.

क्रिकेट खेळाडूंना यशाच्या शिखराकडे घेऊन जाण्यासाठी लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन होणे ही काळाची गरज बनली आहे. वाकोडी येथील साईदीप मैदान हे खेळाडू घडवण्यासाठी उत्तम आहे, सर्व सुविधा या ठिकाणी उपलब्ध असून, खेळाडूंना खेळण्यासाठी चांगले वातावरण देखील आहे. टर्फ क्रिकेटच्या माध्यमातून आयपीएलसारख्या स्पर्धेमध्ये खेळण्यासाठी चांगला खेळाडू निर्माण होईल, असे मत सम्राट देशमुख यांनी व्यक्त केले.

# साखर कामगारांच्या मागण्यांबाबत अखेर त्रिपक्ष समिती गठित

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चेनंतर साखर कामगारांचा मोर्चा स्थगित


मागण्यांसंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करताना साखर कामगार संघटनांचे पदाधिकारी.

नगर – महाराष्ट्र राज्यातील साखर कारखान्यातील व जोडधंद्यातील कामगारांच्या वेतनवाढीसह इतर मागण्यांबाबत विचार करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने शासन निर्णय क्र. ससाका–२०२४/प्र.क्र.४९ कामगार–३, दि.११/१२/२०२४ अन्वये साखर कारखाना मालक प्रतिनिधी आणि साखर कामगार प्रतिनिधी आणि शासन प्रतिनिधी अशी त्रिपक्षीय समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

साखर कामगारांच्या वेतनवाढीच्या मागील कराराची मुदत ३१/०३/२०२४ रोजी संपलेली होती. याबाबत महाराष्ट्रातील महाराष्ट्र राज्य साखर कामगार महासंघ व महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळ या दोन राज्यव्यापी संघटनांनी ७/८/२०२४ रोजी साखर आयुक्त, पुणे यांचे कार्यालयावर सुमारे ५० हजार साखर कामगारांचा इशारा मोर्चा काढण्यात आला होता. परंतु शासनाने त्याची दखल घेतली नाही म्हणून दोन्ही राज्यव्यापी संघटनांनी २८/११/२०२४ रोजी महाराष्ट्र शासन व संबंधितांना संपाच्या नोटीसा पाठविल्या होत्या. तसेच ३/१२/२०२४ रोजीपासुन महाराष्ट्रातील सर्व सहकारी, खाजगी व भाडेपट्ट्याने चालविण्यास दिलेल्या कारखान्यांवर गेट सभा घेऊन १६ डिसेंबर रोजीचा बेमुदत संप यशस्वी करण्यासाठी राज्य दौरे केले होते. त्याचा परिपाक म्हणुन राज्यातील साखर व जोडधंद्यातील कामगार उत्स्फूर्तपणे संपाची तयारी केलेली होती. याची महाराष्ट्र शासनाने दखल घेऊन शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. ८ डिसेंबर रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत साखर संघ व अधिकाऱ्यांची बैठक होऊन त्रिपक्षीय समिती गठित करण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता.

महाराष्ट्र राज्य साखर कामगार महासंघ व महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळ या दोन संघटनांचे प्रमुख पदाधिकारी १० डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता ना. अजित पवार यांच्या दालनामध्ये त्रिपक्षीय समितीबाबत साखर कामगारांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा झालेनंतर ११ डिसेंबर रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्या. यांचे अध्यक्ष पी. आर. पाटील यांनी कामगार संघटनांना महाराष्ट्रातील साखर व जोडधंद्यातील कामगारांचा निर्णय न झालेमुळे साखर कारखान्यातील कामगार १६ डिसेंबर पासुन बेमुदत काम बंद संप स्थगित करण्यात यावा अशी विनंती केल्यानंतरच राज्यातील महाराष्ट्र राज्य साखर कामगार महासंघ व महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळ या संघटनांनी १६ डिसेंबरपासुन पुकारलेला बेमुदत संप महासंघाचे सरचिटणीस कॉ. आनंदराव वायकर, अध्यक्ष कॉ. पी. के. मुंडे, कार्याध्यक्ष शिवाजी औटी, प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे, सरचिटणीस शंकरराव भोसले, कार्याध्यक्ष राऊ पाटील, अविनाश आपटे यांनी मागे घेण्यात आल्याचे सांगितले.

या त्रिपक्षीय समितीमध्ये अहमदनगर जिल्हयातील महाराष्ट्र राज्य साखर कामगार महासंघाचे सरचिटणीस कॉ. आनंदराव वायकर, कार्याध्यक्ष शिवाजी औटी, दत्तात्रय मिठु निमसे आणि अविनाश आपटे यांची निवड झालेली आहे.

# पूर्णवेळ ग्रामसेवक नसल्यामुळे विकासकामे खुंटली; ग्रामसेवक मिळावा अन्यथा तीव्र आंदोलन छेडणार

## पंचायत समितीचे गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे यांना निवेदन


गावाला पूर्णवेळ ग्रामसेवक मिळावा, या मागणीचे निवेदन ग्रामस्थांच्यावतीने ग्रामपंचायत सदस्य बाबासाहेब धिवर यांनी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे यांना निवेदन दिले.

नगर – नगर तालुक्यातील कौडगाव जांब ग्रामपंचायतीला आठवड्यातून दोन दिवस ग्रामसेवक असल्यामुळे गावाची व ग्रामस्थांची विकास कामे आडून पडत आहेत. गावाला पूर्ण वेळ ग्रामसेवक मिळावा असे निवेदन ग्रामस्थांच्या वतीने ग्रामपंचायत सदस्य बाबासाहेब धिवर यांनी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे यांना निवेदन दिले.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य बाबासाहेब धिवर म्हणाले की, गावाला आठवड्यातून दोनच दिवस ग्रामसेवक येत असल्याने गावातील अनेक विकास कामे होत नाही. तसेच ग्रामस्थांचे अनेक कामांचा वेळ लागत असल्याने त्यांचे कामे पुर्ण होत नाहीत. तसेच आठवड्यातून दोन ग्रामसेवक येत, परंतु विविध शासकीय कामांमुळे त्यांना पुरेसा वेळ मिळत नाही. त्यामुळे कौडगाव जांब ग्रामपंचायतीला पुर्ण वेळ ग्रामसेवक मिळावा, अन्यथा तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असे सांगितले.

यावेळी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे यांनी सांगितले की, गावाला पुर्णवेळ ग्रामसेवक देण्याचा प्रयत्न लवकरात लवकर करु. तसेच गावातील अनेक समस्या सोडविण्याचे त्यांनी यावेळी आश्वासन दिले.



हॉटेल दामू–अण्णाचे उद्घाटन प्रसंगी माजी नगरसेविका सौ. शितलताई जगताप, प्रकाश भागानगरे, हॉटेल परिवार सदस्य पौरस बांगर, दुर्गेश सानप, राहुल बांगर, निकिता बांगर, कमलताई आदी.

# हॉटेल 'दामू–अण्णा'चे नव्या जागेत उद्घाटन

नगर – इ.स. १९६३ साली अर्थात ६१ वर्षापूर्वी नगरमधील पानगल्ली, सराफ बाजार येथे दामूअण्णा रामभाऊ बांगर आणि त्यांच्या पत्नी भागुबाई या जोडीने '१० पैश्याला एक कप चहा' या दराने व्यवसाय सुरू करून – चहा आणि नाष्टा सेंटर छोट्याश्या भाड्याच्या जागेत सुरू केले. त्यांचा हा व्यवसाय उत्तरोत्तर वाढत जाऊन १९९१ पर्यंत प्रगती पथावर होता. त्या वेळचे फ्रूट मार्केट, पान मार्केट, गंजबाजार, सराफ बाजार येथील सर्व व्यावसायिक त्यांचा चहा आवडीने पित. १९९१ नंतर त्यांचा मुलगा हरिभाऊ दामूअण्णा बांगर यांनी हा व्यवसाय पुढे सुरू ठेवला आणि आज त्यांच्या तिसऱ्या पिढीतील नातवंडानी हा व्यवसाय कानडेमळा, सारसनगर या नवीन जागेत सुरु केला आहे. माजी नगरसेविका सौ. शीलाताई जगताप यांच्या हस्ते हॉटेल दामू अण्णा या दालनाचा उद्घाटन समारंभ पार पडला.

हातावर पोट भरणारा कष्टकरी समाज सारसनगर परिसरात असून त्यांना अधिक चांगली हॉटेल सेवा देण्यासाठी दामूअण्णा हॉटेल मार्फत ७ रुपयात स्पेशल मसाला चहा, २० रुपयात तीन वडा पाव, ९९ रुपयात कितीबी खा अनलिमिटेड नगरी चिकन थाळी, ६९९ रुपयात बर्थ डे पार्टी स्पेशल एक किलो चिकन पार्टी ऑर्डर: ज्यात चिकन उक्कर, सुक्का मसाला, काळा रस्सा भाजी, दहा भाकरी, तीन राईस, सहा पापड, तीन मिनरल वॉटर बॉटल असा भरगच्च मेन्यू असून परिसरातील नागरिकांमध्ये हे नवीन मेन्यू विशेष लोकप्रिय होत आहेत.

दामू अण्णा हॉटेलचा ग्राहक परिवार मोठा आहे, गेल्या ६१ वर्षापासून ग्राहकांनी दिलेले प्रेम आणि स्नेह हेच आमच्या पुढील पिढीसाठी आपले आशीर्वाद आहेत अशा भावना यावेळी बोलताना संचालक राहुल बांगर यांनी व्यक्त केल्या. यावेळी सौ. शीतलताई जगतप यांचा सत्कार नागरिकांच्या वतीने करण्यात आला असून त्यांनी हॉटेलच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# रिपाईच्या अल्पसंख्याक जिल्हा कार्याध्यक्षपदी नईम शेख



नगर – रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाचे राष्ट्रीय नेते डॉ. राजेंद्र गवई यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये नईम शेख यांची अल्पसंख्याक जिल्हा कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. नुकतेच शहरात झालेल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकीत नईम शेख यांच्या नियुक्तीची घोषणा शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के यांनी केली.

या बैठकीप्रसंगी शहराध्यक्ष दानिश शेख, संदीप वाकचौरे, निजाम शेख, सोफियान काझी, अरबाज शेख, अजीम खान, हुसेन शेख, जमीर शेख, संतोष पाडळे आदी उपस्थित होते.

डॉ. राजेंद्र गवई यांनी जिल्ह्यात उत्तम प्रकारे युवकांच्या माध्यमातून रिपाईचे संघटन झाले आहे. पक्षात काम करताना युवक समाजकारणाच्या भावनेने योगदान देत असल्याचे त्यांनी कौतुक केले.

नईम शेख रिपाईमध्ये मागील सात ते आठ वर्षापासून कार्यरत आहेत. त्यांच्याकडे अल्पसंख्याक शहराध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविण्यात आलेली होती. त्यांचे पक्षातील कार्य व उत्तम संघटन कौशल्याची दखल घेऊन त्यांची जिल्हा कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असल्याचे सुशांत म्हस्के यांनी सांगितले.


रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाचे राष्ट्रीय नेते डॉ. राजेंद्र गवई यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये नईम शेख यांची अल्पसंख्याक जिल्हा कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी उपस्थित पदाधिकारी


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **सगीर नुरसाहब तांबोळी,** रा. तालुका पोलीस स्टेशन जवळ, घर नं. १९२२, बेपारी मोहल्ला, अहमदनगर. यांचे मालकीची असुन सदर मिळकतीचा व्यवहार आमचे अशिला बरोबर झालेला असुन लवकरच सदर मिळकतीचे खरेदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे, असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे.

सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही **प्रकारे चालु वाद, साठेखत, खरेदीखत, करारनामा, मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, जप्ती, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क, हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ (सात) दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही व असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल. याची नोंद घ्यावी. दि. १२/१२/२०२४.

**- परिशिष्ट -**

**मिळकतीचे वर्णन :**- जिल्हा अहमदनगर पोट तुकडी व तालुका नगर पैकी अहमदनगर जिल्हा परिषद हद्दीतील **मौजे भिंगार** येथील खालील वर्णनाची रहिवास कारणास्तव मानिव अकृषिक मिळकत –

**सर्व्हे नंबर २७२/ ब चे क्षेत्र २हे.०२ आर याचा आकार ५ रु.०० पैसे यापैकी लिहून देणार यांच्या संपूर्ण मालकीचे ० हे. ०१ आर क्षेत्र याचा नियोजित प्लॉट नं. ९ या मिळकतीबाबत.**

**यांसी चतु:सीमा** - पुर्वेस : १६ फुटी रस्ता,
दक्षिणेस : सर्व्हे नंबर २७२/ब पैकी
पश्चिमेस : सर्व्हे नंबर २७२/ब पैकी रस्ता,
उत्तरेस : सर्व्हे नंबर पैकी

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

**ॲड. तनवीर एम. शेख**
नोटरी पब्लिक (भारत सरकार)
गोविंदपुरा, अहमदनगर
मो.नं. ९२७०४६४६००

**ॲड. मोहसीन आय. शेख**
**ॲड. गुफरान एफ. मोमीन**
कस्तुरी प्लाझा, डावरे गल्ली, अहमदनगर
मो.नं. ८०८७७४२४२८



## जाहीर नोटीसीस हरकत व नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीस हरकत व नोटीसीने कळविण्यांत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकती बाबत **आमचे आशिल भगवान भास्कर मुंडलीक रा. केळीबाजार, संभाजीनगर** यांचे वडिल कै. भास्कर गंगाधर मुंडलीक यांनी अहमदनगर येथील मे. दिवाणी न्यायालय व स्तर यांचे न्यायालयात स्पे.मु. नंबर २४२/२००९ चा शाम वसंतराव मुंडलीक रा. मुक्ताई निवास, आनंद कॉलनी, बुरुडगांवरोड, अहमदनगर व इतर यांचे विरुध्द दाखल केलेला असून प्रस्तुत दाव्याचे कामकाज अद्याप न्यायप्रविष्ठ आहे. सदर दाव्यात सदर मिळकतींचे मालकी हक्का बाबत व अधिकारा बाबत वाद प्रलंबीत असल्याची माहिती असतांनाही आपल्या पक्षकाराने सदर मिळकत खरेदी घेण्याचे उद्देशाने **ॲड. आर.टी. शर्मा** यांचे मार्फत **दि.१९/११/२०२४ रोजीचे दै. नवामराठा** या वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या नोटीसी वरुन ठरविल्याचे दिसते, प्रतिवादी शाम वसंतराव मुंडलीक यांना सदर मिळकतीत कोणतेही मालकी हक्क नसून मिळकतीत आमचे आशिलांचे मालकी हक्क व अधिकार आहेत. दाव्यामध्ये निष्कारण गुंतागुंत निर्माण करण्याच्या गैरउद्देशाने सदर नोटीस व त्यानंतर खरेदीखत करण्याबाबत संगनमत केल्याचे दिसते. सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी नाही याची नोंद घ्यावी.

सबब शाम वसंतराव मुंडलीक यांचे बरोबर खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीं बाबत कोणीही कोणतेही व्यवहार करु नयेत. याउपर काही व्यवहार झाल्यास मिळकत घेणारांना मालकी हक्क प्राप्त होणार नाहीत, दाव्याचा अंतीम निकाल त्यांचेवर बंधनकारक राहून सदरचे व्यवहार आमचे आशिलाचे हक्कावर बंधनकारक राहणार नाही, केवळ कोणाचीही फसगत होऊ नये म्हणुन ही नोटीस व नोटीस उत्तर प्रसिध्द केले असे.

**- परिशिष्ट -**

अ) जिल्हा अहमदनगर पो. तु. नगर पैकी शहर नगर येथील सि.स. नंबर ३०९३/१ चे क्षेत्र ३७.९४ चौ. मी. ही संपुर्ण जागा व त्यावरील संपुर्ण बांधीव दुकान जागा ब) जिल्हा अहमदनगर पोतु नगर पैकी शहर नगर येथील खिस्तगल्ली भागातील सि.स. नं. २६३५ चे क्षेत्र ११३.७ चौ.मी. यामिळकतीतील अविभक्त हिस्सा येणे प्रमाणे परिशिष्ट असे

दि.१२.१२.२०२४
अहमदनगर

**ॲड. विनायक स. सांगळे**
पत्ता – २३, नरहरीनगर, गुलमोहोररोड, अ.नगर
मो.नं.९८२२२९२४७८


# गंभीर मारहाण प्रकरणातील आरोपीची निर्दोष सुटका

नगर – बाराबाभळी, महेशनगर, भिंगार अ.नगर येथील पटांगणात किरकोळ कारणावरून क्रिकेट बॅट व विटांनी जबर मारहाण केली तसेच फिर्यादी यांच्या वाहनावर व सोबत असलेल्या इतर इसमावर केलेल्या दगडफेक घटनेबद्दल फिर्यादी यांनी भिंगार कॅम्प पो.स्टे.अ.नगर येथे सिध्दांत व पवन विरूद्ध भारतीय दंड संहिता ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४, ४२७ अन्वये गुन्हा दाखल केलेला होता. सदर गुन्ह्याचा समातंर तपास करून तपासी अधिकारी यांनी अ.नगर येथील जिल्हा न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. सदर आरोपी यांनी सदर केसचे कामकाज पाहणे कामी ॲड. सचिनदेवा पाठक यांना नियुक्त केले.

सदर केसचा नुकताच निकाल लागला असून न्यायालयाने आरोपीची पुराव्याअभावी सदर गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता केली आहे. आरोपीतर्फे ॲड. सचिन पाठक यांनी कामकाज पाहिले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिलांबरोबर ठरलेला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बॅक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द **झालेपासून ७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. १२/१२/२०२४**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

**मिळकत वर्णन :** जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, **महानगरपालिका** हद्दीतील **मौजे केडगांव** येथील खालील वर्णनाची मिळकत –

| अ) सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ४७८/२ | २.३८ | २.३१ |
| | पो. ख. ०.०८ | |
| | एकूण– २.४६ | |

ही संपूर्ण शेतजमीन मिळकत

**यांसी चतु:सीमा** - पूर्वेस – सर्व्हे नंबर ४७७, दक्षिणेस – सर्व्हे नंबर ४७५ व ४८०, पश्चिमेस – सर्व्हे नंबर ४७९, उत्तरेस – सर्व्हे नंबर ४९७

| ब) सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ४९७ | ७.०८ | ८.०६ |
| | पो. ख. ०.३६ | |
| | एकूण– ७.४४ | |

ही संपूर्ण शेतजमीन मिळकत

**यांसी चतु:सीमा** - पूर्वेस – सर्व्हे नंबर ५०० आणि ४९८, दक्षिणेस – सर्व्हे नंबर ४७८, पश्चिमेस – सर्व्हे नंबर ४८७ आणि ४८९, उत्तरेस – सर्व्हे नंबर ४९६ आणि ५०१

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक - १. दुरेशहेवर हनिफ कुरेशी,** रा – घर नंबर १९१९, कुरेश मस्जिद, अहमदनगर. **२.इमरान हनीफ कुरेशी** (उताऱ्याप्रमाणे) **इमरान मोहम्मद हनीफ कुरेशी** (आधारकार्ड व पॅनकार्डप्रमाणे) रा.घर नंबर १९१९, तांबोळी किरणा स्टोअर्स जवळ, झेंडीगेट, अहमदनगर–४१४००१. **३. इरफान हनीफ कुरेशी** रा – घर नंबर १९१९, कुरेश मस्जिद, अहमदनगर. **४. गुफरान हनीफ कुरेशी** (उताऱ्याप्रमाणे) **गुफरान मोहम्मद हनीफ कुरेशी** (आधारकार्ड व पॅनकार्डप्रमाणे) रा.घर नंबर १९१९, तालुका पोलिस स्टेशन जवळ, अहमदनगर–४१४००१. **५. वासिमा वाहिद कुरेशी** (उताऱ्याप्रमाणे) **वासिमा कुरेशी** (आधारकार्डप्रमाणे व पॅनकार्डप्रमाणे) रा. शिवाजी चौक, मु पो शेवगांव, ता शेवगांव, जि. अहमदनगर– ४१४५०२. **६. समिना मुझफ्फर कुरेशी** रा. घर नंबर – १९१९, कुरेश मस्जिद, अहमदनगर **७. रफिक अब्दुलगणी कुरेशी** (उताऱ्याप्रमाणे) **मोहम्मद रफिक अब्दुल गणी कुरेशी** (आधारकार्ड व पॅनकार्डप्रमाणे) रा कुरेश मस्जिद, अहमदनगर **८. शरीफ अब्दुलगणी कुरेशी** (उताऱ्याप्रमाणे) **मोहम्मद रफिक अब्दुल गणी कुरेशी** (आधारकार्ड) **कुरेशी एम शरीफ ए गणी** (पॅनकार्डप्रमाणे) रा. घर नंबर १९१९, कुरेश मस्जिद, अहमदनगर **९. आबिद बाबुलाल कुरेशी** रा. घर नंबर १९१९, कुरेश मस्जिद, अहमदनगर १०. समद बाबुलाल कुरेशी रा – घर नंबर १९१९, कुरेश मस्जिद, अहमदनगर **११. समीर बाबुलाल कुरेशी** (उताऱ्याप्रमाणे) **कुरेशी समीर बाबुलाल** (पॅनकार्ड व आधारकार्डप्रमाणे) रा – घर नंबर १९१९, कुरेश मस्जिद, अहमदनगर **१२. मुजाहिद बाबुलाल कुरेशी** (उताऱ्याप्रमाणे व आधारकार्डप्रमाणे) **कुरेशी मुजाहिद बाबुलाल** (पॅनकार्डप्रमाणे) रा. घर नंबर १९१९, तालुका पोलिस स्टेशन जवळ, अहमदनगर. **१३. मोहंमद शफी अहमदलाल कुरेशी** (उताऱ्याप्रामणे) शफी अहमदलाल कुरेशी रा घर नंबर १९१९, कुरेश मस्जिद, अहमदनगर **१४. मोहंमद सादिक अहमदलाल कुरेशी** (उताऱ्याप्रामणे) **मोहम्मद सादिक अहमदलाल कुरेशी** (आधारकार्डप्रमाणे) रा– घर नंबर १९१९, कुरेश मस्जिद, अहमदनगर. **१५.मोहंमद अरिफ अहमदलाल कुरेशी** (उताऱ्याप्रमाणे) **अरिफ अहमदलाल कुरेशी** (पॅनकार्ड व आधारकार्डप्रमाणे) रा घर नंबर १९१९, कुरेश मस्जिद, अहमदनगर. **१६. मोहंमद जाविद अहमदलाल कुरेशी** (उताऱ्याप्रमाणे) **जावेद अहमदलाल कुरेशी** (पॅनकार्ड व आधारकार्डप्रमाणे) रा घर नंबर १९१९, कुरेश मस्जिद, अहमदनगर. **१७. मोहंमद वाहिद अहमदलाल कुरेशी** (उताऱ्याप्रमाणे) **वाहिद अहमदलाल कुरेशी** (आधारकार्ड प्रमाणे) **कुरेशी वाहिद अहमदलाल** (पॅनकार्डप्रमाणे) रा.घर नंबर १९१९, कुरेश मस्जिद,अहमदनगर.

दि.१२/१२/२०२४
अहमदनगर

**ॲड.आर.टी.शर्मा**
**ॲड. गणेश एम. शर्मा**
फोन नं. २३४११०६, मो.नं. ९४२२२२०८४५
ऑफीस नं. १४,१७, पहिला मजला
श्री आनंद कॉम्प्लेक्स, दाळमंडई, अहिल्यानगर


# श्रीकांत फिरोदिया यांची १२५ आयंबिल तपसाधना



नगर – येथील श्रीकांत सुरजमल फिरोदिया यांच्या १२५ आयंबिल तपसाधनेची पचकावणी महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म. सा., प्रबुद्ध विचारक आदर्शऋषीजी म. सा., श्री. अलोकऋषीजी म. सा., विनितदर्शनाजी म. सा., आबाश्री म. सा., विभाश्रीजी म. सा. व अनेक संत सतीयावृंद यांच्या पवित्र पावन सानिध्यामध्ये श्री. तिलोक रत्न स्था. जैन धार्मिक परिक्षा बोर्ड, आनंदधाम, अहिल्यानगर येथे ११ डिसेंबरला आनंदमंगलमय वातावरणात झाली. सदर कार्यक्रमास जनसमुदाय उपस्थित होता.

आगामी २०२४–२५ हे वर्ष राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री. आनंदऋषीजी म. सा. यांचे १२५ वे जन्म जयंती वर्ष आहे याचे औचित्य साधून १२५ आयंबिल तपसाधना पूर्ण केल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

श्रीकांत फिरोदिया यांनी आगामी चातुर्मासाच्या सुरूवातीपासून आयंबिल तपसाधनेस सुरूवात करून चातुर्मास समाप्तीच्या दिवशी सलग ३ मासखमन पूर्ण करून आयंबिल शतकवीर होण्याचा बहुमान सावेडी धर्मस्थानकामध्ये मिळवीला. आजिवन आयंबिल तपाचे भिष्म तपस्वी आचार्य हेमवल्लभ सुरीश्वरजी म. सा. यांच्या अखंड ९९९९ आयंबिल तपामध्ये अनुमोदनार्थ ९ दिवस आयंबिल तपसाधना करून आपला सक्रिय सहभाग नोंदविला व पुढे अखंडित आयंबिल तपसाधना सुरूच ठेवली. आनंदधाम मध्ये ९ ते ११ डिसेंबरला त्रिदिवसीय १११ वा गुरूआनंद व गुरू गणेश दीक्षा जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.

११ डिसेंबर रोजी कर्नाटक गजकेशरी श्री. गणेशलालजी म. सा. व राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री. आनंदऋषीजी म. सा. यांना १११ व्या दीक्षादिन मौनी एकादशी निमित्त आपल्या १२५ आयंबिल तपसाधनेची गुरूदक्षिणा आपल्या गुरूभगवंताच्या चरणी सादर, समर्पित केली.

श्रीकांत फिरोदिया अहमदनगर मर्चंट्स को. ऑप. बँकेचे माजी शाखाधिकारी आहेत. सेवानिवृत्तीनंतर सालाबादप्रमाणे यावर्षीही तपसाधना अखंडीत सुरू ठेवली याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. त्यांच्या पत्नी सौ. संगिता फिरोदिया यांनी १५ दिवसांची तपसाधना तसेच त्यांच्या दोन्ही कन्या सौ. मोनिका बोरा व कु. सोनम फिरोदिया दोघींनीही ९ उपवासाची तपश्चर्या करून कौटुंबिक सहभाग नोंदविला.

# वृद्ध साहित्यिक व कलावंतांनी आधार पडताळणी करुन घ्यावी

नगर – वृद्ध कलावंत व साहित्यिकांना दरमहा मानधन देण्यासाठी शासनाने राजर्षी शाहू वृद्ध कलावंत व साहित्यिक मानधन योजना सुरू केली असून योजनेच्या लाभासाठी वृद्ध साहित्यिक व कलावंतांनी त्यांच्या आधारची पडताळणी १३ डिसेंबर पर्यंत पूर्ण करुन घ्यावी.

जिल्ह्यातील १ हजार ३९४ वृद्ध साहित्यिक व कलावंतांपैकी १ हजार १७३ वृद्ध साहित्यिक व कलावंतांची आधार पडताळणी पूर्ण झालेली आहे.

उर्वरित २२१ आधार पडताळणीसाठी संबंधित तालुक्याच्या पंचायत समिती कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांनी केले आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खालिल परिशिष्टामध्ये नमुद केलेली मिळकतीचे मुळ मालक नामे बळीराम बालराज सिरसुल यांनी सदर मिळकतीचे साठेखत/करारनामा आमचे आशिल नामे कविता रामलु श्रीपत यांचे हक्कात दि. १५/०५/२०२४ रोजी साठेखत/करारनामा दस्त क्रं.३२८/२०२४ अन्वये लिहून नोंदवुन दिलेले आहे. सदर साठेखतामध्ये मुळ मालक बळीराम बालराज सिरसुल यांनी आमचे आशिलांकडून मोठ्या प्रमाणात रक्कम स्विकारलेली आहे. बळीराम बालराज सिरसुल हे सदर मिळकतीचा बेकायदेशीर व्यवहार आमचे आशिलांच्या परस्पर करीत असल्याबाबत आमचे आशिलांना खात्रीलायक समजलेले आहे. त्यामुळे सदर मिळकतीचे मुळ मालक बळीराम बालराज सिरसुल यांनी सदरची मिळकत ही आमचे आशिलांच्या हक्कात दि. १५/०५/२०२४ रोजी साठेखत/करारनामा दस्त क्रं. ३२८/२०२४ अन्वये लिहून नोंदवुन दिले आहे व तेव्हापासुन सदर मिळकतीमध्ये आमचे आशिलांचा हक्क व अधिकार प्रास्तापीत झालेला आहे. त्यामुळे कोणीही कोणत्याही प्रकारे सदर मिळकतीबाबत कोणताही व्यवहार करु नये, सदरचा व्यवहार हा बेकायदेशीर ठरणार असुन तो आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही कोणत्याही प्रकारची फसवणुक अगर फसगत होवु नये म्हणुन सदरची जाहिर नोटीस प्रसिध्द केली आहे.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :**- डि।। अहमदनगर सब डि।। तालुका नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे सावेडी येथील सर्व्हे नं. ३३/३ मधील बिनशेती प्लॉट नं. १७ चे क्षेत्र २८६.८६ चौ.मी. यावर बांधण्यात आलेले 'श्रावणी अपार्टमेंट' मधील स्टिल्ट ग्राऊंड फ्लोअर वरील फ्लॅट नं. १ चे बांधकाम क्षेत्र ३४.७५ चौ. मी., बाल्कनी क्षेत्र ४. २६ चौ.मी., अनकाऊंटेड क्षेत्र ७.०० चौ.मी. असे एकुण क्षेत्र ४६.०१ चौ.मी. ही संपुर्ण फ्लॅट मिळकत.

**यांसी चतु:सीमा** - पुर्वेस : ६ मी. रस्ता, दक्षिणेस : फ्लॅट नं.२, पश्चिमेस : फ्लॅट नं.४, उत्तरेस : फ्लॅट नं.१८

येणेप्रमाणे चतुःसिमा पुर्वक फ्लॅट मिळकत त्यामधील तदंगभुत वस्तु व वागणुकीचे, वहिवाटीचे तसेच इतर सर्व हक्क व अधिकार तसेच सोयी सुविधासह काही एक राखुन न ठेवता.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस दिली असे.

दिनांक – १२/१२/२०२४
अहमदनगर

**ॲड. राजू भास्कर गाली**
(बी.ए.एलएल.एम.)
पत्ता – ऑफिस नं.१, निर्मल टॉवर्स, शनी चौक,
अहमदनगर मो.८३२९९३४२०३


# बलात्काराच्या आरोपातून निर्दोष मुक्तता

नगर – रोडने जात असताना तिला जवळच्या शेतात ओढून नेऊन जिवे मारुन टाकीन अशी धमकी देऊन २० वर्षाच्या तरुणीवर ७ जानेवारी २०२४ रोजी रात्री ८.४५ वा. अत्याचार केला. सदर घटना कोणास सांगितली तर मी तुला जिवंत ठेवणार नाही या आरोपावरुन पाथर्डी पोलिस स्टेशनला आरोपी योगेश पांडुरंग कराळे यांचे विरुध्द भा.दं. वि. कलम ३७६, ५०६ व अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ३ अन्वये गुन्हा दाखल झाला होता नुकतीच त्याची सुनावणी अहमदनगर येथील जिल्हा न्यायालयात होऊन त्यात आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. आरोपीतर्फे सतिशचंद्र वि. सुद्रीक यांनी काम पाहिले.


## कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालय, अहिल्यानगर

ई–मेल ॲड्रेस:- nagartahsildar@gmail.com दूरध्वनी क्रमांक:- ०२४१–२४११६००
क्र. कावि/ Mag–२/५५६/२०२४ अहिल्यानगर दि. ११/१२/२०२४

## जाहीर नोटीस

श्री. चंद्रकांत माधवराव शिंदे
नालेगाव, ता. जि. अहिल्यानगर } वादी
विरुद्ध
अधिकारी, जन्म–मृत्यू नोंदणी विभाग,
अहिल्यानगर, महानगरपालिका, अहिल्यानगर } प्रतिवादी

ज्याअर्थी अर्जदार यांनी सदरचा अर्ज जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३(३) अन्वये मा. तहसीलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार चंद्रकांत माधवराव शिंदे यांचे आई नामे शिऊबाई माधवराव शिंदे यांचा दि. ०९/०६/२०११ रोजी मृत्यू झालेला आहे. त्यांचे मृत्यूची नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसा मृत्यू प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मा.न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी अर्जदार चंद्रकांत माधवराव शिंदे यांची आई नामे शिऊबाई माधवराव शिंदे यांचा मृत्यू झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुराव्यानिशी मा. तहसीलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात कळवाव्यात. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार नामे शिऊबाई माधवराव शिंदे यांचे मृत्यूची नोंद प्रतिवादी यांच्याकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकूम करतील. मग त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही.

येणेप्रमाणे आज दि. ११/१२/२०२४ रोजी जाहीर नोटीस आज रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली असे.


**तहसीलदार अहिल्यानगर करिता**

# धम्माल मनोरंजन

## मनोरंजक शब्दकोडे

**आडवे संकेत**

१) वाफेने चालणारे जहाज
४) एक टुथपेस्ट कंपनी
८) अशा प्रकारचा
१०) ब्रह्मांड, सृष्टी
११) पावसाळ्यातील मंत्र्यांचे अधिवेशन १४) मोठी जाड सूई
१६) मिथिलेचा एक राजा
१७)दात २१) जिले मुले आहे ती
२३)आमिष २५) सुख, शांती
२६) हादरा २७) एक लवचिक वस्तू
२८) सहा चा टोला
३१) बाहेर
३२) माया, हव्यास, एक वृक्ष
३३) बिना का गीतमाला आता या नावाने आहे
३५) विचार, दुःख (हिं.)
३७) गाठण्याचे काम करणारा
४०) गजाआड, बंदी
४१) मृदू ४२) ढोरमेहनत
४५) टॅक्स, कर
४६) पायात घालतात त्या
४८) ताई, मोठी बहिण
४९) विठ्ठलाचा अवतार विटेवरी पाय ५१) दिव्यांची माला
५२) जाड लेखणी
५३) बाजारबुणगे
५४) प्राण



**उभे संकेत**

२) हत्ती ३) भिंतीतले खिंडार, तळघर ४) शंकर, हर
५) वेळू, बांबू ६) हृदय
७) उणे विरुद्ध
८) रोड, कमताकद
९) अल्प, लहान
११) दोन शेतातून गेलेला रस्ता
१२) अधिक, आणखी
१३) पुर्वीची स्थिती बदलवून नवीन स्थिती तयार करणारा महात्मा १५) ओहोटी विरुद्ध
१८) अस्वल १९) षडाननाची आई २०) मर्द चित्रपटाचा निर्माता २२) वडी, गोळी
२३) लांबलचक, कंटाळा आणण्याजोगे
२४) एक अंमली पदार्थ
२५) एकूण एक
२९) दिल्लीत स्थित एक वाहन, एक प्रकारची घोडागाडी
३०) आवड दाखविणारा
३४) किरकोळ, छोटे–मोठे
३६) कातिन (हिं.)
३७) ब्रेड ३८) हाताने काढलेले, भरतकाम
३९) मोठा दगड
४०) सात पावलांची सप्तपदी तर आठ पावलांची.... ४३) दो आँखे (चित्रपट) ४४) माघार
४७) रवा, साखर पासून बनविलेला चिकट पदार्थ
४८) तिरुपती
४९) कारले हे असते
५०) पोळी शेकण्याचे साधन

## दिनविशेष १३डिसेंबर२०२४

जन्मदिवस / जयंती / वाढदिवस:

१७८०: योहान वुल्फगँग डोबेरायनर – जर्मन रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: २४ मार्च १८४९)

१८०४: मेजर थॉमस कॅन्डी – कोशकार व शिक्षणतज्ञ, मराठीत विरामचिन्हे वापरण्यास त्यांनी प्रथम सुरुवात केली, इंडियन पीनल कोडचे त्यांनी मराठीत भाषांतर केले. (मृत्यू: २६ फेब्रुवारी १८७७)

१८१६: सीमेन्सचे संस्थापक वर्नर व्हॅन सीमेन्स यांचा जन्म. (मृत्यू: ६ डिसेंबर १८९२)

१८९९: पांडुरंग सातू नाईक – आल्हाददायकता, कल्पकता व वास्तवता ही वैशिष्ट्ये

१९०३: प्रसिद्ध कादंबरीकार इलाचंद्र जोशी यांचा जन्म.

१९२५: प्रसिद्ध लेखक लक्ष्मी चंद्र जैन यांचा जन्म.

१९४०: भारतीय अर्थशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक संजय लोळ यांचा जन्म. (मृत्यू: १८ जुन २००५)

१९५४: भारतीय ऑटोलरीगोलॉजिस्ट आणि राजकारणी हर्षवर्धन यांचा जन्म.

१९५५: मनोहर पर्रीकर – गोव्याचे मुख्यमंत्री

१९६०: प्रसिद्ध दक्षिणात्य चित्रपटांचे अभिनेते व्यंकटेश दग्गुबाती यांचा जन्म.

मृत्यू / पुण्यतिथी / स्मृतिदिन:

१०४८: ला फारसी विद्वान लेखक अलबेरूनी यांचे निधन.

१७८४: सॅम्युअल जॉन्सन – ब्रिटिश साहित्यिक, टीकाकार, पत्रकार व विचारवंत (जन्म: १८ सप्टेंबर १७०९)

१९२२: आइसलँड देशाचे पहिले पंतप्रधान हेंस हाफस्टाइन यांचे निधन. (जन्म: ४ डिसेंबर १८६१)

१९३०: फ्रिट्झ प्रेग्ल – सेंद्रीय पदार्थांच्या पृथ्थक्करणासाठी १९२३ मधील रसायनशास्त्राचा नोबेल पुरस्कार मिळवणारे ऑस्ट्रियन शास्त्रज्ञ (जन्म: ३ सप्टेंबर १८६९)

१९६१: अ‍ॅना मेरी रॉबर्टसन ऊर्फ 'ग्रँडमा मोझेस' यांचे वयाच्या १०२ व्या वर्षी निधन. वयाच्या ७७ व्या वर्षी त्यांनी पेंटिंगच्या छंदाची सुरुवात केली आणि त्यात प्रसिद्धी मिळवली. अमेरिकन ग्रामीण जीवनावरील त्यांची पेंटिंग्ज आजही प्रसिद्ध आहेत. (जन्म: ? ? १८६०)

१९८६: स्मिता पाटील – अभिनेत्री. त्यांचे 'निशांत', 'मंथन', 'भूमिका', 'जैत रे जैत', 'गमन', 'चक्र', 'उंबरठा' इत्यादी चित्रपट लोकप्रिय झाले. पद्मश्री (१९८५), दोन राष्ट्रीय पुरस्कार व एक फिल्मफेअर अ‍ॅवॉर्ड (जन्म: १७ आक्टोबर १९५५ – पुणे)

१९९४: विश्वनाथ अण्णा तथा तात्यासाहेब कोरे – सहकार क्षेत्रातील अग्रणी व्यक्तिमत्व, वारणा परिसराच्या विकासाचे शिल्पकार, वारणा सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक, यशवंतराव चव्हाण यांचे निकटचे सहकारी (जन्म: १७ आक्टोबर १९१७ – कोडोवली, पन्हाळा, कोल्हापूर)

१९९६: श्रीधर पुरुषोत्तम तथा शिरुभाऊ लिमये – स्वातंत्र्यसैनिक, क्रांतिकारक, कॅपिटॉल बॉम्बस्फोटाचे सूत्रधार, (जन्म: ? ? ????)

२००६: अमेरिकन फुटबॉल लीग आणि वर्ल्ड चॅम्पियनशिप टेनिसचे संस्थापक लामर हंट यांचे निधन. (जन्म: २ ऑगस्ट १९३२)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ | फ | रा | त | फ | र | | | स | त्य | म |
| का | वा | सा | की | | वा | र | बि | ला | सी | नी | | यु |
| झी | | मा | र | का | | क | | ल | | | बा | रा |
| रं | | न्य | | | | | वै | | सा | ज | | |
| गां | गा | | मा | मा | | अं | ध | क | | | मा | ता |
| | जा | य | या | ची | जा | त | | र | स | म | ला | ई |
| आ | वा | | जा | | ग | र | ज | वं | त | | | |
| स | जा | | ध | | रु | पा | | द | ल | ब | द | लू |
| रा | | दे | व | | क | ट | क | | ज | र | | |
| | अ | शा | | ब | | | ल | | | ड | ग | ला |
| चा | प | ट | पो | ळी | | लो | क | व | न | | र | ग |
| | ज | न | क | रा | जा | | ला | | व | सा | | व |
| को | य | | | जा | | का | ट | क | स | र | | ड |

### फळ व आरोग्य

**ताक**

**शरीरशुद्धी आणि मलशुद्धी**

ज्यांना शरीरशुद्धी आणि मलशुद्धी करुन घ्यावयाची आहे त्यांनी सर्व आहार बंद करावा आणि केवळ ताकावर राहावे. तिसऱ्या दिवशी शरीरात स्फूर्तीचा अनुभव येतो. उत्साह द्विगुणित होतो. जठर व आतड्यांवर आराम मिळाल्यामुळे पचनसंस्था कार्यक्षम बनते. हा प्रयोग सहा महिन्यांतून एकदा जरुर करुन पहा! औषधापासून दूर रहा!


ताप शरीरात गेल्यानंतर जठर व आतडी यांच्यावर विशेष परिणाम करते. त्यामुळे पचनसंस्था सुधारण्यास मोलाची मदत होते. शरीरात साचलेले विषारी घटक नष्ट होण्याची प्रक्रिया सुरु होते. रक्तशुद्धीचा प्रवास सुरु होते.

### म्हणी व अर्थ

**खुंट्याशी सोडली नि झाडाला बांधली.**

**अर्थः** कुठेही बंधनातच नसणे.

## मनोरंजक शब्दकोडे



**आडवे संकेत**

१) ऑस्ट्रेलियाचे राजचिन्ह ३) व्याकरणात सर्वनामाचा एक प्रकार८) प्रफुल्लता
९) लग्न ठिकाण
११) मजबूत, ताकदवान
१२) पायजमा
१३) नास्ता, न्याहारी
१५) दुःखाची वेदना
१६) उणीव भरुन काढणारी १७) आसमंतातील प्रदेशात
१९) पिरपिरपणा
२०) बिब्यातील बी
२१) वर्णाच्या साह्याने करावयाचे गणित
२३) आजी, म्हातारी
२४) बारदान
२५) चपळ, क्रुर, पाणीदार
२७) रीत, परंपरा
२८) हरिणाचा बच्चा

**उभे संकेत**

२) जिकडे तिकडे वार्ता पसरविणे
३) बारीक बारीक पुटकुळ्यांचा समुदाय
४) मैदानाबाहेर गेलेला क्रिकेटचा चेंडू ५) क्षणीक गोल वादळ ६) खोड, रोजची सवय
७)कविता लिहिणारा
९) अनेक, पुष्कळ तऱ्हेचे १०) प्रत्येक कामात हुशार १३) झाडांना वेलींना लागते ते १४) घसा, गळा
१५)वेश्या१६) भारतवर्ष
१७) देहू
१८) पाठलाग, जोराचा हल्ला २०) साठा ठेवण्याची जागा, वखार २२) एक प्रगतशील देश २४) गाईचे मुल२६) सेवक

### मागील उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| न | ज | र | | व | रा | ह | | व | सा |
| | र | | को | य | | र | ख | र | ख |
| स | त्का | र | स | मा | रं | भ | | प | र |
| म | रु | त | | न | ग | रा | ध्य | क्ष | |
| र | | ल | व | | रु | | | | ड |
| गी | ता | | ल | ट | प | ट | पं | ची | |
| त | र | तु | द | | | र | ग | | ज |
| | घ | र | | अं | | घा | त | पा | त |
| स | र | ई | | त | रु | णी | | रा | न |

### रुचिदा



**मसाल्याची भेंडीची भाजी**

**साहित्यः** १ पाव कोवळी भेंडी, १ वाटी बेसन, धने जिरे पूड, लिंबाचा रस, तिखट, मीठ, हळद, तेल मोहरी हिंग, कोथिम्बीर गरम मसाला.

**कृतीः** भेंडी स्वच्छ धुवून कोरडी करावीत. नंतर कढईत थोड्या तेलात बेसन भाजावे. त्यात तिखट, मीठ, हळद, गरम, मसाला, धने जिरे पूड टाकून बेसन चांगले परतून भांड्यात काढावे. त्यात बेसनाचे सारण दाबून भरावे. कढईत तेल मोहरी हिंगाची फोडणी करुन भरलेला भेंड्या टाकाव्यात व मंदाग्नीवर मधून खाली वर करुन खमंग व मऊ शिजवाव्यात. परतताना मसाला निघतो. म्हणून कढई सांडशीने पकडून उडवावी व भेंड्या वर खाली कराव्यात. सर्व बाजूने लालसर शिजल्यावर भांड्यात काढाव्यात व सर्व्ह करताना वरुन कोथिम्बीर टाकावी.

### विनोद

**सतीशः** बाबा, आता आपण लवकरच श्रीमंत होणार आहोत.

**बाबाः** अरे वा! कसं बरं?

**सतीशः** गणिताच्या बाई म्हणाल्या की, त्या आम्हाला आता पैशांचे रुपये बनवायला शिकवणार आहेत.


### मागील फिल्मी कोड्याचे उत्तर


| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| खु | न | ब | हा | गं | गा | मे | | स | र | फि | रा | |
| न | | ल | | गा | | ज | | ल | | जा | | ह |
| का | र | वा | | कि | शो | र | कु | मा | र | | ग | म |
| क | | न | म | क | | सा | | न | | ब | द | ला |
| र्ज | | | | स | | ब | र | खा | ब | हा | र | |
| | ते | रे | ना | म | | | | न | ज | र | | तु |
| | री | | सि | | | अ | | | रं | | प्रे | म |
| ए | क | औ | र | सि | कं | द | र | | ग | र | म | |
| | स | | हु | | | ना | | ज | ब | | वि | |
| रा | म | | सैं | म | स | न | | मि | ली | | वा | |
| स्ते | | जी | न | त | | सा | ज | न | | क | ह | र |
| | जी | | | वा | | मी | | | | स | | वि |
| अं | त | रा | मा | ली | | | दि | वा | ना | म | स्ता | ना |

## फिल्मी शब्दकोडे

**आडवे संकेत**

१) सन् १९९८ में टी.एल.वि. प्रसाद निर्देशित इस फिल्म में मिथून चक्रवर्ती और मधू थे. ५) सन् १९९३ में रमेश तलवार निर्देशित इस फिल्म में ऋषी कपूर, संजय दत्त और माधूरी दीक्षीत थे. ८) दुल्हन हम ले जायेंगे इस फिल्म में करिश्मा कपूर का नाम.
९) दादागिरी इस फिल्म में मिथून चक्रवर्ती की हिरोईन. ११) सन् १९८८ में हरीश शाह निर्देशित इस फिल्म में धर्मेंद्र और रती अग्निहोत्री थे. १३) चंद्रन (अभिनेत्री) १४) खान (अभिनेता)
१६) सन् १९८२ में अजित सिंह नारंग ने बनाई इस फिल्म में धर्मेंद्र और हेमा मालिनी थे. १७) सन् १९९३ में प्रमोद चक्रवर्ती ने बनाई इस फिल्म में अक्षय कुमार और करिश्मा कपूर थे. १८) सन् १९५८ में बनी सोने की चिडीया इस फिल्म का अभिनेता.
२०) सन् १९९८ में सुनील अग्निहोत्री निर्देशित इस फिल्म में अक्षय कुमार और रविना टंडन थे. २१) अंदर बाहर इस फिल्म की एक अभिनेत्री. २२) चलो चले मितवा तेरी उची निची राहों में.... यह गीत इस फिल्म का है. २४) सन् १९९८ में मनिरत्नम निर्देशित इस फिल्म में शाहरुख खान, प्रिती झिंटा और मनिषा कोईराला थे. २५) सन् १९८९ में अजिज सेजावल निर्देशित इस फिल्म में धर्मेंद्र, मिथून चक्रवर्ती, संजय दत्त, राखी, माधूरी दीक्षीत और अमृता सिंह थे. २७) सन् १९८१ में रमेश तलवार निर्देशित इस फिल्म में शशी कपूर और रेखा थे. २८) के लिए कुछ भी करेगा (फिल्म) २९) हर किसीको नही मिलता यहां प्यार जिंदगी में.... यह गीत इस फिल्म का है. ३१) सन् १९९३ में के.सी. बोकाडिया निर्देशित इस फिल्म में विवेक मुश्रान, अजय देवगन और प्रतिभा सिन्हा थे. ३३) अजग देवगन, सुनील शेट्टी, रिया सेन और रविना टफंडन अभिनीत फिल्म. ३५) सन् १९९४ में शोमू मुखर्जी ने बनाई इस फिल्म में सलमान खान और मनिषा कोईराला थे.





**उभे संकेत**

१) सन् १९८० में स्वरुपकुमार निर्देशित इस फिल्म में मिथून चक्रवर्ती और योगिता बाली थे.
२) बने चाहे दुश्मन जमाना हमारा सलामत रहेगा हमारा.... (गीत)
३) सन् १९८५ में सुबोध मुखर्जीने बनाई इस फिल्म में राज बब्बर और रती अग्निहोत्री थे.
४) सन् १९९६ में अब्बास मस्तान निर्देशित इस फिल्म में ऋषी कपूर, अरबाज खान और जुही चावला थे. ५) वो दिन (फिल्म) ६) सन् २००० में राज कंवर निर्देशित इस फिल्म में बॉबी देओल और रानी मुखर्जी थे. ७) सन् १९९५ में राज कंवर निर्देशित इस फिल्म में अनिल कपूर और श्रीदेवी थे. १०) सामने जीगर के पास.... (गीत) ११) सन् १९७२ में नरेंद्र बेदी निर्देशित इस फिल्म में रणधीर कपूर और जया भादुडी थे.
१२) सन् १९९८ में दीपक सरीन निर्देशित इस फिल्म में सलमान खान और ट्विंकल खन्ना थे.
१३) सन् १९८२ में चंदर बहल निर्देशित इस फिल्म में मिथून चक्रवर्ती और रंजीता थे.
१५) जीना है प्यार में जिना मरना है प्यार में मरना.... यह गाना इस फिल्म का है.
१६) सन् १९८६ में अजय कश्यप निर्देशित इस फिल्म में संजय दत्त और अनिता रॉय थे.
१९) अभिनेता दिलीपकुमार की अभिनेत्री पत्नी.
२३) सन् १९८४ में सावन कुमार निर्देशित इस फिल्म में सुनील दत्त, अनिल कपूर और पुनम ढिल्लो थे. २४) सन् १९९९ में प्रकाश झा निर्देशित इस फिल्म में अजय देवगन, काजोल और महिमा चौधरी थे. २६) और आशिक (फिल्म)
३०) जीगर इस फिल्म में करिश्मा कपूर का नाम.
३२) सन् १९९४ में रामगोपाल वर्मा निर्देशित इस फिल्म में व्यंकटेश और श्रीदेवी थे. ३४) हर सवाल का जवाब नही मिल सकता मेरे प्यार का हिसाब.... यह गीत इस फिल्म का है.



सरपंचाच्या खून प्रकरणाची चौकशी करून आरोपीवर कायदेशीर कारवाई करा, या मागणीचे निवेदन अखंड मराठा समाजाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

# सरपंच खून प्रकरणी चौकशी करून आरोपीवर कायदेशीर कारवाई करावी

## अखंड मराठा समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन

नगर – मस्साजोग, ता. केज, जी.बीड चे आदर्श सरपंच संतोष देशमुख यांचे दिवसाढवळ्या अपहरण करून अतिशय निंदनीयपणे खून करण्यात आला व त्यांचा मृतदेह रस्त्यावर फेकून देण्यात आला आहे. या प्रकरणाबाबत संतोष देशमुख यांचे अपहरण करून खून करणाऱ्या सर्व आरोपींना तात्काळ अटक करावी तसेच आरोपींना राजकीय वरदहस्त देणाऱ्यांना व केजच्या पोलीस निरीक्षकांचे निलंबन करून त्यांना सह आरोपी करण्यात यावे. हे प्रकरण सीआयडीकडे हस्तांतरित करून फास्टट्रॅक कोर्टात चालवावे तसेच घटनेचे प्रत्यक्ष साक्षीदार शिवराज देशमुख व मयत संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना पोलीस संरक्षण देऊन पुनर्वसन करण्यात, यावे या मागणीचे निवेदन निवासी जिल्हाधिकारी यांना अखंड मराठा समाजाच्यावतीने निवेदन देण्यात आले.

# नगर शहरातील आंबेडकरी समाजाच्यावतीने परभणीतील घटनेचा निषेध व्यक्त करून निदर्शने

नगर – परभणी शहरामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर ठेवण्यात आलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीची एका अज्ञाताने मंगळवारी सायंकाळी तोडफोड करून विटंबना केल्यामुळे समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने निषेध नोंदवून मार्केटयार्ड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर निदर्शने करण्यात आली.



परभणीतील घटनेचा नगर शहरात आंबेडकरी समाजाच्यावतीने मार्केटयार्ड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर निषेध व्यक्त करून निदर्शने करण्यात आली.

यावेळी अशोक गायकवाड, राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष सुरेश बनसोडे, अजय साळवे, सुमेध गायकवाड, सुनील साळवे, सुनील शिंदे, किरण दाभाडे, महेश भोसले, अमित काळे, संजय जगताप, दीपक लोंढे, अमर निर्भवणे, विजय गायकवाड, सागर ठोकळ, हरीश आल्हाट, संदीप वाकचौरे, दया गजभिये, नवीन भिंगारदिवे, लखन सरोदे, संतोष पाडळे, विशाल गायकवाड, विनोद भिंगारदिवे, विशाल भिंगारदिवे, कौशल गायकवाड, शोभा गाडे, सारंग पटेकर, संघराज गायकवाड, संजय भिंगारदिवे, सोनू पाटोळे, सुजित घंगाळे, ऋषिकेश पाडळे, अजय बडोदे, नितीन कसबेकर, समीर भिंगारदिवे, येसुदास वाघमारे, प्रकाश कांबळे, शांतवन साळवे, जुनेद शेख, प्रा.भिमराव पगारे, पप्पू पाटील, सतीश साळवे, दीपक सरोदे, अविनाश भोसले आदीसह समाजबांधव उपस्थित होता.

पुढे सुरेश बनसोडे म्हणाले की, परभणी येथे घडलेल्या घटनेचा सर्व आंबेडकरी समाजाच्या वतीने व पक्ष संघटनेच्या वतीने निषेध व्यक्त करण्यात आला तसेच बांगलादेशातील बौद्ध भिक्कु यांच्यावरील हल्ल्याचे देखील निषेध करण्यात आले व जो परभणी येथे घडलेल्या घटनेचा निषेध व्यक्त करत आरोपीला तात्काळ अटक करून देशद्रोहचा गुन्हा दाखल करून लवकरात लवकर फाशीची शिक्षा देण्यात यावी तसेच सर्व आंबेडकरी समाजाच्या वतीने महाराष्ट्रात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी कायमस्वरूपी एक पोलीस नेमण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

# नुसती संस्था उभी करणे उपयोगाचे नाही, ती चालविणारी माणसे उभी करणे महत्वाचे

### डॉ. गिरीष कुलकर्णी

भिंगार – नुसती एखादी संस्था उभी करुन उपयोगाची नसते तर ती संस्था चालविणारी माणसे उभी करणे महत्वाचे आहे, असे प्रतिपादन अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या भिंगारमाध्य व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण प्रसंगी बोलताना स्नेहालय संस्थेचे संस्थापक डॉ. गिरीष कुलकर्णी यांनी केले.



भिंगार हायस्कुलचे वार्षिक पारितोषिक वितरणप्रसंगी डॉ. गिरीष कुलकर्णी, छायाताई फिरोदिया आदी.

शालेय जीवन हा आपला पाया असल्याने विद्यार्थ्यांनी आपले गुरुजन व आई–वडील यांचा आदर करावा असे प्रतिपादन प्रास्ताविकेतून संस्थेच्या प्रमुख कार्यवाह श्रीमती छायाताई फिरोदिया यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. कुलकर्णी यांची प्रकट मुलाखत चि. अक्षय नरवाला, कु. थोरात रोशनी, निर्भय अंभोर व अर्णव सावेकर या विदयार्थ्यांनी घेतली. श्री. कुलकर्णी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तर देताना म्हणाले की संस्थेची सुरुवात घरातूनच झाली व स्नेहालय संस्थेच्या उभारणीत भिंगार हायस्कूलचे खूप मोठे योगदान आहे. जग सुंदर करण्याच्या कल्पनेत आपले योगदान काय आहे. हे योग्य वयात कळणे महत्वाचे आहे, मला दुःख होते पण ते दूर करण्यासाठी मी काय करू शकतो हे समजायला वेळ लागतो.

एका विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरादाखल श्री. कुलकर्णी म्हणाले की, चांगले सिनेमे जरुर पहावेत. सिनेमे जीवनाला दृष्टिकोन देतात,शहरात अहमदनगर एज्युकेशन सोसायटी सारख्या संस्था आहेत म्हणून चांगली माणसे घडत आहेत. या कार्यक्रम प्रसंगी सल्लागार मंडळाच्या सदस्या सुनिता मुथा, शाळा समिती चेअरमन नंदकुमार झंवर, सदस्य संजय सपकाळ, रविंद्र बाकलीवाल, किसनराव चौधरी, रवी लालबोंद्रे, डॉ. अशोक चंगेडे, जालिंदर बोरुडे, संजय बोरा, रुपेश भंडारी माजी मुख्याध्यापक पडोळे एस. आर. आव्हाड बी. जे. रात्रशाळेच्या मुख्याध्यापिका सौ. वाळूजकर व्ही. एस. नविन मराठी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. गांगर्डे व्ही.ए., अनभूले एन. एस. उपप्राचार्य भांड आर. एन., पर्यवेक्षिका सौ. गायकवाड एम. पी या वर्षीच्या वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त विद्यार्थीनी प्रतिनिधी म्हणून कु. यशस्वी राजेश खारगे, विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून चि. साईराज शंकर गवळी होते. तर शिक्षक प्रतिनिधी म्हणून एम. डी. साबळे होते.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा राज्यस्तरीय स्पर्धेत यश मिळाल्याबददल कार्यक्रमाचे अध्यक्ष गिरीश कुलकर्णी यांनी कौतूक केले. सामुहिक स्वागतगीत व ईशस्तवन कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. शारिरीक शिक्षण प्रात्यक्षिके, कराटे, लाठीकाठी, तलवारबाजी, दांडपट्टा सुर्यनमस्कार व मानवी मनोरे आणि कुस्ती या प्रकारांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. पारितोषिक वितरण करुन विद्यालयाच्या प्राचार्यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# बालिकाश्रम रोडवर जुन्या वादातून २ कुटुंबात हाणामारी; गुन्हा दाखल

नगर – जुन्या वादाचा मनात राग धरून दोन कुटुंबात एकमेकांना शिवीगाळ मारहाण करत धमकी दिल्याची घटना बालिकाश्रम रोडवरील अजय अपार्टमेंट येथे घडली घडली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात परस्पर विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

याबाबतची माहिती अशी की बालिकाश्रम रोडवरील अजय अपार्टमेंट येथील राहणारे जगताप व वरखेडकर कुटुंबात जुने वाद होते या वादातून त्यांचे नेहमी भांडण होत असे. बुधवारी (दि.११) गुलाब रंगनाथ जगताप व अमोल वरखेडकर हे वाद मिटवण्याकरिता बोलत असताना अमोल भीमराज वरखेडकर व हर्ष अमोल वरखेडकर यांना त्यांचा राग आला असल्याने त्यांनी त्यांना शिवीगाळ करून मारहाण केली. त्यावेळी जगताप यांची मुलगी भांडण सोडवण्याकरता आली असता वरखेडकर यांनी तिलाही मारहाण केली. अमोल वरखेडकर यांने गुलाब जगताप यांच्या कानाला चावा घेतला. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अमोल वरखेडकर व हर्ष वरखेडकर यांच्या विरोधात मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

दुसऱ्या फिर्यादीमध्ये वैशाली वरखेडकर यांनी म्हटले आहे की त्यांचा पती अमोल वरखेडकर हा सकाळी ११ वाजता मुलीला शाळेतून आणण्यासाठी गेला असता गुलाब जगताप यांनी मागील भांडणाच्या कारणावरून त्यास शिवीगाळ करून मारहाण केली. याबाबत त्यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल केली. पोलिस ठाण्यात तक्रार दिल्याच्या रागातून प्रशांत जगताप व त्याच्या बरोबर एक अनोळखी इसम दुपारी वैशाली वरखेडकर या घरी असताना त्यांच्या घरी आले व त्यांनी मोठमोठयाने शिवीगाळ केली. यावेळी वैशाली वरखेडकर यांनी घराचा दरवाजा उघडला असता प्रशांत याने त्यांना बाहेर ओढून मारहाण केली. त्यावेळी गुलाब जगताप, ज्योती जगताप, श्वेता भांडे, प्रशांत जगताप, विद्या जगताप व इतरांनी अमोल वरखेडकर व त्याच्या मुलीस मारहाण केली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात वैशाली वरखेडकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



भारतीय बुद्धीबळ संघाचे देवेंद्र वैद्य यांच्या यशस्वी कामगिरीनंतर कर्णबधिर मित्र मंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

# आशियाई पॅसिफिक गेम्स स्पर्धेत भारतीय बुद्धीबळ संघाला ब्रांझपदक

नगर – मलेशियातील क्वालांलापूर येथे १ ते ८ डिसेंबर दरम्यान आयोजित आशियाई पॅसिफिक गेम्स २०२४ मधील बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या टीम इंडियाने ब्राँझ पदक मिळवले. या संघाचे नेतृत्व नगरच्या देवेंद्र वैद्य यांनी केले. त्यांच्या नेतृत्वाखाली भारताने या स्पर्धेत प्रभावी कामगिरी करत ब्राँझ पदकाची कमाई केली.

देवेंद्र वैद्य यांच्या यशस्वी कामगिरीनंतर कर्णबधिर मित्र मंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी अपंग राज्य पुरस्कार विजेते अजय गांधी, तलाठी बबलू बल्लाळ, अंबादास नामदे, व मनिष गांधी यांच्या हस्ते देवेंद्र वैद्य आदी उपस्थित होते.

# संस्कृती संवर्धन प्रतिष्ठानच्या शालेय वक्तृत्व स्पर्धा यशस्वी

नगर – मुंबई येथील संस्कृती संवर्धन प्रतिष्ठानची अहिल्यानगर शाखा नगरमध्ये गेली तीन वर्षे १८ शाळांमध्ये संस्कृती संवर्धनाचे काम करीत आहे. विशेषतः संस्था शाळांमध्ये रामायण, महाभारत संतकथा, क्रांतिकारी लोकांविषयी मुलांना माहिती व्हावी, यासाठी काम करते. शाळेमधील मुलांना वरील विषयांवरची पुस्तके दिली जातात व जानेवारीमध्ये त्या मुलांची परीक्षा घेतली जाते, जी मुले जास्तीत जास्त मार्कानं पास होतात त्यांना सुवर्णपदक देऊन त्यांचा सत्कार करण्यात येतो. याच संस्थेच्या अंतर्गत विविध कार्यक्रम ही घेतले जातात. मुलींना स्वतःचे संरक्षण कसे करावे स्वयंसिध्दाया अंतर्गत वकील, पोलिस व जुडो कराटे मधील लोकांना बोलवून शाळेमधील मुलांना प्रशिक्षण व मार्गदर्शन केले जाते. शिवाय मुलांना वेगवेगळे विषय देऊन निबंध स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा ही घेतल्या जातात.



संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान, मुंबई संस्थेच्या शालेय स्तरावरील वक्तृत्व स्पर्धेतील पारितोषिक विजेते स्पर्धक शिक्षकांसह दिसत आहेत.

संस्थेच्या अहिल्यानगर शाखेने आनंद विद्यालय सावेडी येथे वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शहरातील प्रमुख शाळांनी आपले विद्यार्थी पाठवून सहभाग नोंदविला.

सर्व विद्यार्थीनी खूप तयारीनिशी उत्कृष्टपणे संभाषण साधले सर्व शाळांनी मनापासून विद्यार्थ्यांची तयारी करून घेतलेली होती.

दोन गटात झालेल्या या स्पर्धेचे परीक्षण ज्येष्ठ रंगकर्मी अनिकेत देऊळगावकर, सौ. दीपा जानवे, सौ. रजनी ढोरजे, सौ.मीरा बेलेकर, सौ.सविता धर्माधिकारी आदींनी करून परीक्षकांची जबाबदारी उत्कृष्टरित्या पार पाडली.

या स्पर्धेचे मोठ्या गटात भाऊसाहेब फिरोदिया विद्यालयाच्या रत्नप्रभा देविदास पवार हिने प्रथम क्रमांक पटकाविला द्वितीय क्रमांक. समृद्धी अविनाश आठरे (जय बजरंग माध्यमिक विद्यालय) तृतीय क्रमांक. आर्या धनंजय मनवेलकर (रेणावीकर माध्यमिक विद्यालय) उत्तेजनार्थ पहिले. नमस्वी सचिन शेलार (ग. ज. चितांबर विद्या मंदिर), उत्तेजनार्थ दुसरे दिपाली सुदाम पवार (सखाराम मेहेत्रे विद्यालय)

उत्तेजनार्थ तिसरे समृद्धी किशोर कोल्हे (माणिकताई करंदीकर बालिकाश्रम) यांनी मिळवले तर लहान गटात प्रथम क्रमांक सिद्धेश अमोल क्षीरसागर, द्वितीय क्रमांक आस्था आनंद भंडारी, तृतीय क्रमांक रुही मंगेश पिंगळे, आणि उत्तेजनार्थ पहिले पियुष बाळासाहेब उबाळे (बजरंग प्राथमिक विद्यालय), उत्तेजनार्थ दुसरे ऋतुजा अजय बांगर सखाराम मेहत्रे विद्यालय), उत्तेजनार्थ तिसरे मिताली प्रसाद कुलकर्णी (रेणावीकर प्राथमिक विद्यालय) यांनी मिळवले.

परिक्षकांच्या वतीने वक्तृत्व स्पर्धेविषयी बोलताना अनिकेत देऊळगावकर यांनी विषयाची मांडणी, अभ्यास, विचार त्याचबरोबर आत्मविश्वास, भाषाशुध्दी, स्पष्टोचार, आवाजातील चढ–उतार, आवश्यक तिथे सुभाषिते, श्लोक, वचने, सुविचार तसेच लेखकांची, तज्ञांची मते, विषयास अनुसरून वर्तमानपत्रातील, पुस्तकातील, कथा कादंबऱ्यातील संदर्भ अधोरेखित करून सांगण्याबाबतचे मार्गदर्शन केले.. तसेच फक्त स्पर्धेपुरते विषयाचे पाठांतर न करता महापुरुषांचे विचार समजावून घेऊन ते आत्मसात करून पुढे जनमानसात पोहोचवण्यासाठीचे कार्य करणे आवश्यक आहे असे सांगितले.

सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सर्टिफिकेट व विजयी विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी श्रीमती आशा देशपांडे, सौ. पल्लवी जोशी, सौ.कल्पना गोगटे, रक्षिता लिमये. या सर्व कार्यकर्त्यांनी जबाबदारी पार पाडली.



मोरया युवा प्रतिष्ठान दिनदर्शिका २०२५ चे प्रकाशन अहिल्यानगर शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिरात करण्यात आले. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष ईश्वर पवार, उपाध्यक्ष स्वामी टाकळकर, धीरज पोखरणा, शुभम टाकळकर, मनोज लुनिया, सागर शर्मा, अतिश शिंगरे, रोहित चंगेडिया, दर्शन चाणोदिया, संकेत गुरव, अमित जिंदम, हर्ष पवार, हिमांशू साखला, अतुल रासकर, सुमित पोखरणा, गणेश शेळके, वैभव शिंदे, गोर जाना, धनुभाऊ भोसले आदी सदस्य.

# केडगावमध्ये किरकोळ कारणावरुन तरुणाला शिवीगाळ करून मारहाण

नगर – रस्त्यातून बाजूला व्हा, असे म्हणाल्याचा राग आल्याने तरूणाला शिवीगाळ करून मारहाण करण्यात आली. युनुस याकुब पठाण (वय ३०, रा. पाटील कॉलनी, केडगाव) असे मारहाण झालेल्या तरूणाचे नाव आहे. मंगळवारी (दि.१०) दुपारी १२ वाजता पाटील कॉलनीत ही घटना घडली.

जखमी पठाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संकेत खांडवे (रा. अरणगाव ता. नगर) असे गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. मंगळवारी फिर्यादी पायी घरी जात असताना संकेत रस्त्यात उभा होता. फिर्यादी त्याला बाजुला व्हा, आम्हाला जावुद्या असे म्हणाले. त्याचा त्याला राग आल्याने त्याने फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केले. जीवे ठार मारण्याची धमकी दिली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक विकास काळे करत आहेत.

# केडगाव परिसरातून ३७ वर्षीय तरुण बेपत्ता

नगर – केडगाव येथील दूधसागर सोसायटी, मयुरीनगर येथून बदाम मनोहर चोरमागे (वय ३७) हा तरुण महिंद्रा कंपनीची टी यु व्ही मॉडेलची चार चाकी गाडी घेऊन घरात कोणाला काही एक न सांगता कोठेतरी निघून गेला असून तो अद्याप परतलेला नाही.

घरच्यांनी त्याचा सर्वत्र शोध घेतला तो कोठेही मिळून आला नाही. शहरातील वाडिया पार्क येथे त्याने नेलेली चार चाकी गाडी बुधवारी (दि.११) मिळून आली. मात्र त्याचा तपास न लागल्याने त्याचा भाऊ शशिकांत मनोहर चोरमागे यांनी याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दिली असून पोलिसांनी तशी नोंद केली आहे.

बेपत्ता बदाम चोरमागे याचा शरीरबांधा सडपातळ, उंची पाच फूट सात इंच, रंग गोरा, डोळे काळे, केस काळे, नाक सरळ, अंगात पांढऱ्या रंगाचा शर्ट व साधी पॅन्ट, उजव्या हाताने अपंग असून त्याच्याबाबत काही माहिती मिळाल्यास कोतवाली पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



### भाजपा युवा मोर्चा जिल्हा संयोजकपदी सागर शिंदे यांची निवड

शेंडी ग्रामपंचायतीचे सदस्य सागर शिंदे यांची अहिल्यानगर दक्षिण भाजपा युवा मोर्चा जिल्हा संयोजकपदी निवड करण्यात आली असून तसे पत्र जिल्हाध्यक्ष अक्षय शिवाजीराव कर्डिले यांनी देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, प्रदेश उपाध्यक्ष उमेश भालसिंग आदी उपस्थित होते.



के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात भारतीय भाषा उत्सव साजरा करण्यात आला.

# के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात भारतीय भाषा उत्सव साजरा

नगर – के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात भारतीय भाषा उत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाच्या परिसर संचालिका प्रा.डॉ. स्वाती मुनोत यांनी तमिळ महाकवी सुब्रमणिया भारती यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन केले. व अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना मातृभाषा ही आपली जननी असून तिचा सन्मान, संवर्धन करणे तसेच इतर भाषांविषयी आदर राखणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाची भूमिका विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. सविता चव्हाण यांनी स्पष्ट केली. तर प्रा. डॉ. वर्षा कीर्तने यांनी सुब्रमणिया भारती यांच्या बद्दल मत व्यक्त केले. तर आभार प्रा.आरती खेडकर यांनी मानले. याप्रसंगी सौ. अमृता मुळे, सौ. हर्षाली रासकर व विद्यार्थी उपस्थित होते.

## कल्पवृक्ष श्री स्वामी समर्थ मठात १४ डिसेंबर रोजी दत्तजन्म सोहळा

नगर – कल्पवृक्ष श्री स्वामी समर्थ मठ सातभाई मळा, अहिल्यानगर येथे १४ डिसेंबर रोजी सकाळी १० वा हभप श्री दुतारे महाराजयांचे संगीत प्रवचन आयोजित करण्यात आले आहे.

दुपारी १२ वा दत्तजन्म सोहळा होणार असून त्यानंतर आरती आणि प्रसाद वाटप करण्यात येणार आहे. संध्याकाळी ६ वाजता सानिका गोरेगावकर आणि आदिती गराडे यांना पुरस्कार देण्यात येणार असून त्यानंतर त्यांचा गायन आणि वादनाचा कार्यक्रम होणार आहे. तसेच १५ डिसेंबर रोजी दुपारी १२.३० वा आरती व नंतर महाप्रसाद होणार आहे. स्वामी भक्तांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

